आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, १४ एप्रिल २०२३

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ध्येयाने प्रेरित होऊनच सामाजिक कार्याची सुरुवात केली.सामाजिक बांधिलकी जोपासण्याच्या कार्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विविध माध्यमे वापरली. मानवाचा सर्वांगीण विकास हे त्यांच्या जीवन कार्याचे अंतिम ध्येय होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही एक त्यांच्या ध्येयाचाच भाग होती. अमेरिकेमध्ये निग्रोंची चळवळ सुरू होती. तेथील एका विद्यार्थ्यांनी 1916 साली कोलंबिया विद्यापीठात भरलेल्या राष्ट्रीय परिषदेत एक पेपर सादर केला. निग्रो चळवळ कशी गतिमान झाली. या चळवळीला कोणी कोणी आधार दिला, प्रेरणा दिल्या. बुद्धिजीवी वर्गानी केलेले काम किती महत्त्वपूर्ण आहे. चळवळीला गतिमान करण्याचे काम तेथील वृत्तपत्रानेही केले होते. तेथील वृत्तपत्राने निग्रोची कैफियत मांडली होती म्हणजेच त्यांची चळवळ गतिमान केली होती. त्यावेळी हे सारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ऐकले आणि वृत्तपत्राचे महत्त्व जाणले. म्हणून त्यांनी वृत्तपत्र काढण्यास सुरुवात केली. युग बदलून टाकण्याची क्षमता पत्रकारितेत आहे. समाज परिवर्तनाचे एक महत्वाचे हत्यार म्हणून या वृत्तपत्रांकडे पाहिले जाते .म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता म्हणजे लोक पत्रकारिता होती. तिच्यातून मानवता निर्माण करण्याचा प्रयत्न चालू होता.सर्वधर्मसमभाव अशी त्यांच्या पत्रकारितेची ओळख होती.आपले प्रश्न,आपले दुःख,आपल्या वेदना मांडण्याचे एक प्रभावी शस्त्र म्हणून वृत्तपत्राकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाहत असत. म्हणून त्यांनी वृत्तपत्र काढून समाज सुधारण्याचा ध्यास अंगी बाळगला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इथल्या भारतीय वृत्तपत्राच्या स्वरूपाचा आणि भूमिकेचाही सखोल अभ्यास केलेला होता म्हणूनच त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात दमदार पाऊल टाकले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की ," कोणत्याही चळवळीला यशस्वी होण्यासाठी एका वर्तमानपत्राची आवश्यकता असते .ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसेल तिची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते".डॉ. आंबेडकरांनी जवळजवळ 36 वर्ष म्हणजे 1920 ते 1956 पर्यंत पत्रकारिता केलेली दिसून येते. डॉ. आंबेडकरांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता, प्रबुद्ध भारत ही वृत्तपत्रे काढली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आदर्श पत्रकारिता





## मूकनायक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराजांची भेट दत्तोबा पवार यांनी घडवून आणली. राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा परिचय होत होता. त्यामुळे शाहू महाराजही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे मूल्यमापन करत होते;म्हणून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना एक पाक्षिक काढण्यासाठी आर्थिक मदत द्यायची ठरवले. त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 31 जानेवारी 1920 रोजी ' मुकनायक ' नावाचे पाक्षिक सुरु केले.या पाक्षिकाचे संपादक म्हणून नंदराम भटकर यांना नेमले स्वतःचे संपादक म्हणून नाव न टाकता त्यांनी भटकर यांचे नाव टाकले.स्वतःचे नाव जरी नसले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ते पाक्षिक सुरू केले आहे हे सर्वांना माहीत झाले होते. त्या काळात अस्पृश्यता प्रचंड मोठ्या प्रमाणावर बोकाळली होती. त्यामुळे त्या वृत्तपत्राची फार गरज होती. याविषयी धनंजय कीर म्हणतात की, " अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने तो काळ किती प्रतिकूल आणि कठोर होता ह्याची कल्पना 'केसरी' या वर्तमानपत्राने 'मूकनायका ' बद्दल दोन शब्द लिहिणे तर सोडाच पण पैसे घेऊन त्याची जाहिरातसुद्धा छापण्याचे नाकारले यावरून येईल "यावरून आपल्या लक्षात यायला लागते की अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी या वृत्तपत्राची किती निकड होती. टिळकांचीही भूमिका अस्पृश्य समाजाकडे बघण्याचीही कशी होती हे लक्षात यायला लागते. टिळकांनी पैसे देऊनही जाहिरात छापली नाही म्हणजे त्यांना परिवर्तन नको होते.आज पुरुषांच्या सुधारणेच्या विरोधीच त्यांची भूमिका होती असेही स्पष्ट दिसून यायला लागते.' मूकनायक ' काढण्यामागची भूमिका तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर अगदी सरळ सरळ मांडत असत. त्यांनी आपले विचार मांडताना पहिल्याच अंकात लिहिले होते याविषयी धनंजय कीर लिहितात की, "हिंदुस्तान हा देश म्हणजे केवळ विषमतेचे माहेरघर आहे.हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक जात म्हणजे एक एक मजला आहे. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की,या मनो-यास शिडी नाही. एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्यांनी त्याच मजल्यात मरावे.

खालच्या मजल्यातील इसम मग तो कितीही लायक असो त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातील माणूस मग तो कितीही नालायक असो त्याला खालच्या मजल्यावर लोटून देण्याची कुणाचीही छाती नाही."

अशी जातीव्यवस्था इथे प्रत्येकाच्या मनामनात घर करून बसलेली आहे.असे जातीचे मजले तयार केले गेले होते. हेच जातीव्यवस्थेचे मजले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नष्ट करायचे होते. समाजाला बोलतं करायचं होतं;आणि इथल्या स्थितीची जाणीव करून देऊन त्या जातीव्यवस्थेच्या मनोऱ्याला हादरे द्यायचे होते म्हणूनच पाक्षिकाची त्यांची गरज होती. ज्ञान नसल्यामुळे दलितांकडे सत्ता नाही.ज्ञान आणि सत्ता नसल्यामुळे त्यांचे मागासलेपण हटत नव्हते. त्यांची उन्नती म्हणजेच प्रगतीची वाढ होण्याऐवजी ती खुंटत होती.त्यामुळे त्यांना दारिद्र्यात व लाचारीत जीवन जगावे लागत असे.या साऱ्या परिस्थितीची जाणीव जर त्यांना झाली तर त्यांच्यात बदल होईल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटायचे म्हणून त्यांनी या साऱ्या गोष्टींची चर्चा अगदी मुद्देसूदपणे ' मूकनायका 'त घडवून आणण्याचा प्रयत्न करीत होते. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना लंडनला जायचे असल्यामुळे या 'मूकनायक ' पाक्षिकाची संपूर्ण जबाबदारी त्यांनी भटकर यांच्याकडे सोपवली होती .बाबासाहेब लंडनला गेल्यामुळे वर्गणीदार कमी झाले. त्यामुळे हे पाक्षिक 1923 मध्ये बंद पडले.

**बहिष्कृत भारत :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारत ' नावाचे पाक्षिक 3 एप्रिल 1927 साली सुरू केले. 19 व 20 मार्च 1927 साली महाड येथे कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेचे पहिले अधिवेशन झाले. तेव्हा या बहिष्कृतांच्या चळवळीला खंबीर प्रचाराचा आधार देण्यासाठी एका वृत्तपत्राची गरज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटू लागली त्यातूनच 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्राचा जन्म झाला असेही सांगितले जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जे सामाजिक कार्य करत त्या



**प्रा. डॉ. सतीश मस्के,**
मराठी विभागप्रमुख, कर्म. आ. मा. पाटील कला,
वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर
ता. साक्री, जि. धुळे, मो.9423397484

कार्यावर विरोधक टीका करू लागले. वर्तमानपत्रातून अशा टीकाकारांना उत्तर दिले पाहिजे त्यासाठी आपल्याला वृत्तपत्राची गरज आहे म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ' बहिष्कृत भारत 'काढले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संत साहित्याचा म्हणजेच संत कबीर, संत ज्ञानेश्वर यांचाही चांगलाच अभ्यास केला होता. संत ज्ञानेश्वरांनी चातुर्वर्णव्यवस्थेवर टीका केली होती. संत ज्ञानेश्वर हे बंडखोर संत होते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अंकाच्या अग्रणी त्यांच्या ओळी दिल्या होत्या.

" आता कोदंड घेऊनी हाती ! आरुढ पांडुरंग येथे रथी!

देई आलिंगन वीर वृत्ती समाधानी! जगी कीर्ती रूढवी स्वधर्माचा मानू वाढवी!

या वृत्तपत्रातून त्यांनी अनेक महत्त्वाचे प्रश्न मांडले आहेत. सामाजिक हिताच्या दृष्टीने ते प्रश्न मांडत असत.या अंकाच्या पहिल्या पानावर पहिल्या स्तंभात ' सुबोध वचने' आणि दुसऱ्या व तिसऱ्या स्तंभात 'आजकालचे प्रश्न ' असे स्वरूप ठेवून आपली पत्रकारिता चालवली. याविषयी प्रा. सुखराम हिवराळे म्हणतात की," 'आजकालचे प्रश्न' आणि 'प्रासंगिक विचार' हे सदर नियमित प्रसिद्ध करून त्या काळातील अनेक प्रश्नांचा ऊहापोह करण्यात आला आहे.तर 'प्रासंगिक विचार' व्यक्त करताना अनेकविध प्रश्नावर त्यांनी मूलभूत विचार व्यक्त केलेले आढळतात 'बहिष्कृत भारत' मधील अग्रलेख,स्फुटलेख, वाचकांचा पत्रव्यवहार, विविध लेख, वृत्तपत्रातून इ.स.1927 ते 18 जानेवारी 1929 पर्यंत एकूण 34 अंकात जो विविध प्रकारचा मजकूर प्रसिद्ध झालेला आहे त्या सर्व मजकूरातून एकूण दीड वर्षातील महत्त्वाच्या प्रश्नावर विचार प्रकट झालेले आढळतात." त्याचबरोबर बहिष्कृत भारत मधून लोकहितवादींचे पत्रे पुन्हा प्रकाशित केली.द.वि. प्रधान यांची'वर्णाश्रमाची मीमांसा'ही लेखमाला प्रकाशित केली. विठ्ठल रामजी शिंदे यांचे'पूर्व बंगालमधील अस्पृश्य वर्गांच्या उच्च शिक्षणाची स्थिती'हेही लेख छापले. त्याचबरोबर हिंदूंचे धर्मशास्त्र, हिंदू महासभा व अस्पृश्यता, महार व त्यांचे वतन,
अस्पृश्यता निवडण्याचा पोरखेळ, महाड
येथील धर्मसंघ व वरिष्ठ हिंदूंची जबाबदारी अशी काही अग्रलेख ही छापली. अनेक अग्रलेख स्वतः डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिली.


**समता :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी' समता ' नावाचे पाक्षिकही काढले. ' बहिष्कृत भारत ' चालू असतानाच 'समता' पाक्षिकाचा जन्म झाला. याविषयी माहिती सांगताना चरित्रकार वसंत मून म्हणतात की," 15 नोव्हेंबर 1929 पर्यंत 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र चालू होते. या बहिष्कृत भारताबरोबरच 29 जून 1928 रोजी 'समता ' हे पाक्षिक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली निघू लागले. "त्याविषयी चरित्रकार खैरमोडे म्हणतात की," 'समता' या पत्राचे संपादक दे.वि. नाईक हे होते. हे वृत्तपत्र समाज समता संघाच्यावतीने निघत असे." अशाप्रकारे हे पत्र काढून त्याकाळात जातीयता व अस्पृश्यता जी शिगेला पोहोचली होती तिचा नायनाट करण्यासाठी अशा वृत्तपत्राची गरज होती. भावी उन्नती कशी साधायची किंवा त्यासंबंधीचे मार्ग काय असतील त्यासाठी अशा वृत्तपत्राच्या आवश्यकता होतीच.'बहिष्कृत भारत'व' समता' ही दोन्ही वृत्तपत्रे आर्थिक विंवचनेमुळे जास्त काळ टिकू शकली नाहीत." जातीभेद व त्यांचे अंतिम स्वरूप अस्पृश्यता ही नष्ट करून जातिभेदामुळे रूढ होऊन बसलेली सामाजिक विषमता नष्ट करणे हे 'समता' पत्र्याचे ध्येय होते." (प्रदीप गायकवाड ,जनता, समता प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती 2007, पृष्ठे 5


**जनता :** ' बहिष्कृत भारत ' व ' समता ' ही दोन्ही वृत्तपत्रे बंद पडली. सामान्य माणसांचे,मागासलेल्या व पददलित माणसांच्या सुख दुःखाचा किंवा भावभावनांचा विचार करणारे एखादेही वृत्तपत्र नव्हते. त्यामुळे आपल्या विचारांची कुचंबना होत आहे असे वाटू लागले. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'जनता' हे वृत्तपत्र 24 नोव्हेंबर 1930 साली काढले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वृत्तपत्राकडे समाज सुधारण्याचे हत्यार म्हणून पाहत असत. तळागळातील अस्पृश्य समाजाला स्वःअस्तित्वाची जाणीव करून देणे, त्यांच्या जीवनाला एक नवीन आकार देऊन त्यांना संघर्षोन्मुख बनविणे, त्याचबरोबर त्यांना विचार करायला लावण्यासाठी वृत्तपत्रे ही महत्त्वाची कार्य बजावत असतात ते महत्त्वाचे माध्यम आहे असे ते मानत असत. वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रश्न मांडणे, सोडवणे, समस्यांची जाणीव करून देणे ह्यासाठी वृत्तपत्रे महत्त्वाची बाजू बजावत असतात. म्हणून' जनता' पाक्षिकाचा पहिला अंक 24 नोव्हेंबर 1930 साली प्रसिद्ध झाला. सलग 22 अंक क्रमाने प्रसिद्ध झाल्यावर 23 आणि 24 वा अंक 'संयुक्त अंक' म्हणून प्रसिद्ध करण्यात आला. 19 ऑक्टोबर 1929 रोजी पुरवणी अंक काढण्यात आला. या 'जनता' वृत्तपत्राचे संपादक देवराव विष्णू नाईक हे होते. देवराव नाईक हे विचाराने पुरोगामी व अस्पृश्यांच्या चळवळीत भाग घेणारे ब्राह्मण कार्यकर्ते होते.गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल असे ब्रीद वाक्य लिहिले जात असे. जनता पत्र हे जवळजवळ 25 वर्ष चालले परंतु अधून मधून ते कधी कधी खंडित होत असे. सामाजिक, शैक्षणिक प्रश्नाबरोबर धर्मांतराच्या संदर्भातही विचार जनता वृत्तपत्रामधून मांडला जायचा.

नंतर नंतर यामध्ये भा.र. कद्रेकर, ग.नी. सहस्त्रबुद्धे, बी.सी. कांबळे व यशवंतराव आंबेडकर यांनीही संपादक म्हणून जबाबदारी पार पाडलेली दिसते. यानंतर मात्र "जनता" पाक्षिकाचे साप्ताहिक मध्ये रुपांतर झाले. याविषयी धनंजय कीर म्हणतात की," 'बहिष्कृत भारत 'हे आपल्या पाक्षिकाचे नाव असल्यामुळे ते पत्र बरेच लोक घेत नाहीत. आपले म्हणणे सर्वांना कळावे हा उद्देश सफल होत नाही. म्हणून त्यांनी पत्राचे नाव 'जनता' असे ठेवले आहे. 'जनता' पत्राचे प्रकाशक व व्यवस्थापक भास्करराव कद्रेकर होते.

**प्रबुद्ध भारत :** 'प्रबुद्ध भारत' हे वृत्तपत्र स्वतंत्रपणे इतर वृत्तपत्रा प्रमाणे जन्माला आलेले नव्हते. तर 'जनता' वृत्तपत्राचे रूपांतर होते. जनता पत्राचे प्रबुद्ध भारत असे नामांतर 4 फेब्रुवारी 1956 साली करण्यात आले..'प्रबुद्ध भारत' या साप्ताहिकाने ही त्याकाळी पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये एक आपला आगळा आणि वेगळा ठसा उमटविला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक परिवर्तनवादी विचार रुजविणारे पत्रकार होते. नवनवीन विचार सांगून जनतेमध्ये परिवर्तन घडवून आणणारे पत्रकार होते. त्यामुळे 'प्रबुद्ध भारत' नेही परिवर्तनवादी पत्रकारितेचा आदर्श निर्माण केलेला होता हे आपल्याला दिसून येईल. या वृत्तपत्राच्या माध्यमातून तथागत बुद्धाचे विचारही समाजात रुजविण्याचा विचार होता. मुकुंदराव आंबेडकर, भाऊराव गायकवाड, आर.डी.भंडारे, बी.सी.कांबळे व घनश्याम तळवटकर हे संपादक मंडळ होते. यामध्ये रिपब्लिकन पार्टी पक्षाचा उद्देश, कार्य या संदर्भातल्या घडामोडीही यात येत असत. या वृत्तपत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व शैक्षणिक बाबतची ही मौलिक विचारांची माहिती यामध्ये दिली जायची.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पत्रकारितेतून प्रगत समाज घडविणे, समाजाचा सर्वांगीण विकास करणे, धर्म, जात, पंथ यांना छेद देऊन मानवाच्या कल्याणासाठी, विकासासाठी पत्रकारितेतून विचार देऊन राष्ट्रहीत व राष्ट्रविकास साधने हेच महत्त्वाचे असते असे त्यांना वाटत होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही केवळ दलित,अस्पृश्य व पददलित यांच्यासाठीच नव्हती तर ती आखिल मानवाचा सर्वांगिण विकास करणारी होती हे आपण लक्षात घ्यायला हवे. आजच्या म्हणजे हल्लीचा युगातली पत्रकारिता तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेपुढे फिकी पडायला लागते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा आदर्श आजही उपयुक्त असाच आहे. हे ध्यानात घ्यायला हवे. वृत्तपत्र हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. परंतु आजचे वृत्तपत्र हे खऱ्या अर्थाने आधारस्तंभ ठरण्याऐवजी तो वधस्तंभ ठरतो आहे की काय असे एकंदरीत चित्र दिसायला लागते. देशात आज खूप मोठ्या प्रमाणावर समस्या आहेत, जीवघेणे प्रश्न आहेत पण कुणी बोलत नाही अन् लिहीतही नाही. पत्रकारही त्यांना म्हणावे तेवढ्या प्रमाणात उजेडात आणत नाही ही वस्तुस्थिती आहे . म्हणून आजच्या पत्रकारिता क्षेत्रांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कार्य केले तर निश्चितच भारत देश महासत्ता होण्यास मदत होईल.



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


आधुनिक केसरी

पण आता गौतमाचा निर्णय झाला होता. संसार हा असार आहे. मानवी जीवनातील चिरंतन सत्याचा शोध घ्यायलाच हवा आणि तो इथे राहून शक्य नाही याची त्याला खात्री झाली होती. हा निश्चय दृढ झाला आणि त्याने आपली पत्नी, मुलगा, राजप्रासाद, नगर सगळं काही सोडण्याचा निर्णय घेतला. रात्रीच्या वेळी आपल्या सारथ्याला आपला घोडा तयार करण्याची आज्ञा त्याने दिली.

खरं तर आपल्या परवानगीशिवाय गौतमाला कुठेही जाऊ देऊ नये ही शुद्धोधन राजाची आज्ञा होती. पण या वेळी छन्नाने आपल्या मित्राचे ऐकण्याचे ठरवले. त्याने गौतमाचा घोडा तयार ठेवला.

कंथक नावाचा हा अश्व गौतमाचा अतिप्रिय होता. जाण्यापूर्वी एकदा तरी आपल्या पत्नी आणि मुलाला पाहून घ्यावे म्हणून तो यशोधरेच्या महालात आला. आपल्या गोड मुलाला एकदा जवळ घ्यावे असे त्याला वाटले पण यशोधरेचा हात त्याच्या अंगावर होता. तो बाजूला केला तर यशोधरा जागी होईल असे त्याला वाटले. अशा वेळी त्याच्या मनात कोणत्या भावना दाटून आल्या असतील ? अश्रूंनी त्याच्या डोळ्यात गर्दी केली असेल. पण त्याने पुन्हा आपल्या भावनांना आवर घातला. पुढे गौतमाला त्याच्या निश्चयापासून परावृत्त करण्यासाठी ' मार ' नावाचा राक्षस येतो. तो गौतमाला निरनिराळी प्रलोभने दाखवून त्याच्या निर्णयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो. त्यालाच ' बुद्ध प्रलोभन ' असे म्हटले जाते. मला वाटते गौतमाचे हे प्रलोभन किंवा एक प्रकारची परीक्षा आपल्या पत्नी आणि मुलाचा निरोप घेण्यापासूनच सुरु होते. मला या प्रसंगी श्रीकृष्ण जन्माच्या वेळेची आठवण येते. कंसाने बंदिवासात ठेवलेल्या वसुदेव देवकीच्या पोटी श्रीकृष्णाचा जन्म होतो. वसुदेव त्याला गोकुळात पोहोचवण्यासाठी निघतात तेव्हा तुरुंगातील सगळ्या पहारेकऱ्यांना गाढ झोप लागलेली असते. वसुदेवाच्या शृंखला आपोआप गळून पडतात, दरवाजे उघडले जातात.



## आनंदी पहाट

# थेंबे थेंबे तळे साचे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

थेंबे-थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे एक एक रुपयांच्या बचतीतून त्यांच्याच भावी आयुष्यासाठी लाखो रुपयांची बचत होऊ शकते. अनेक प्रकारच्या बिलांची रक्कम आगाऊ भरल्यास अथवा इंटरनेटद्वारे भरल्यास मिळणारी सूट एकप्रकारे काही प्रमाणात आपली बचतच करत असते. प्रत्येक महिन्याची हि एकूण रक्कम अगदी शंभर रुपये असली तरीही वर्षभराची याद्वारे होणाऱ्या आपल्या बचतीची रक्कम एक हजार दोनशेहून अधिक असणार आहे. आपल्या पैशाच्या गुंतवणुकीला भावनांची जोड असते. आपल्या भाव-भावना, आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण, चांगले-वाईट अनुभव या सर्वच गोष्टींचा संबंध आपल्या पैशाच्या गुंतवणुकीशी असतो. त्यामुळे आपण करत असलेली "गुंतवणूक भावनांची असते आणि आनंद कोट्यावधींचा असायला लागतो". या आनंदाची अनुभूती अनुभवण्यासाठी निश्चितच काही विशेष खबरदारी घ्यावी लागते. काहीवेळा आपल्या गुंतवणुकीचा विषय भावनेचा असल्यामुळे आपण निर्णय देखील भावनेच्या आहारी जाऊन घेतो. आणि तो भावूकतेत घेतलेला निर्णय आपल्या भवितव्यावरच घाला घालतो. आपलं भवितव्य उज्वल होण्याच्या ऐवजी उध्वस्त होण्याची शक्यता निर्माण होते. हल्ली अनेक प्रकारची प्रलोभने दाखवून आणि फसव्या जाहिराती करून तसेच मोठ्या परताव्याची आमिषे दाखवून इंटरनेट, मोबाईल, सोशल नेटवर्किंग या विविध माध्यमांच्या वापरातून अनेकांच्या फसवणुकीच्या घटना घडत असल्याचं आपण नेहेमीच ऐकत आहोत. या अशा प्रकारच्या फसवणुकीचा फटका आपल्याला बसणार नाही यासाठी आपण सदैव सतर्क राहणं आवश्यक आहे. आपल्या पैशाची गुंतवणूक करताना अविचारांना दिला थारा कि समजा तुमच्या लाखाचे झाले बारा. आपली सजगता, सतर्कता, समय सूचकता आणि सावधानता याच गोष्टी आपल्या सुखी, समृद्धी आणि सदा-सुखी जीवनासाठी महत्वाच्या ठरणार आहेत. त्यासाठीच "गुंतवणूक भावनांची असली तरीहि आनंद कोट्यावधींचा असायला हवा".



आधुनिक केसरी

**चंद्रभागा नीर | लोचनात ||**
यादवांचे घरी | राम कृष्ण हरि ||
सूर दरबारी | गंधर्वांचे ||१||
पंचपदी दंग | झाले श्रोतेजन ||
वैष्णवांचे गाण | आनंदाचे ||२||
नादब्रह्म रूप | भजनाचा रंग ||
मनीचे तरंग | अमृताचे ||३||
शब्दांचे माधुर्य | साधनेचे फळ ||
अमृत रसाळ | ताल सूर ||४||
पंढरीच्या वाटे | भैरवीचे सूर ||
चंद्रभागा नीर | लोचनात ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

**वार्ताऽल्पाऽपि करोत्येव**
**सुखं श्रेष्ठं नृणां यदि।**
**जानीयात् सुजनं तं वै**
**सर्वोपकारणे क्षमः ।।२।।**

ज्याच्याशी थोडे बोलणे सुद्धा माणसांना श्रेष्ठसुखकारक असते, त्याला खरोखर उपकार करण्यास सक्षम असा भला माणूस जाणावे.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**द्रोह किसी से नहिं करे, सम हित सहज स्वभाव।**
**अज्ञानी द्वेषी मिलै, कर कल्याण प्रभाव ।।२७।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल तृतीय अध्याय) ०२/३/२७**



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
विवेकी संत आपल्या सहज स्वभावाने सर्वांशी वागतात. कुठल्याही प्राण्याबद्दल त्यांच्यात आकस नसतो. सर्वांच्या कल्याण आणि उत्कर्षाची त्यांची प्रवृत्ती असते. अज्ञानी, द्वेषी अशा सर्व प्राण्यांबद्दल (मनुष्य प्राणी) कल्याणाची भावना ठेऊन ते आपल्या संत भावात स्थिर असतात.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.www.vihangamyoga.org**

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी

ज्या निरूपणात आत्मज्ञानाचे विवेचन नाही ते निरूपण नाही. साधकाने परमार्थाचे ग्रंथ अभ्यासवेत.सगळेचं ग्रंथ चांगलेच असतात पण आत्मज्ञानाससठी अध्यात्मिक ग्रंथचं उपयोला येतात.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

माणूस आत्मज्ञाना पर्यन्त कस पोहचतो ज्या ग्रंथामध्ये शाश्वत काय अशाश्वत काय यांचे विवेचंन सार व असार कोणते हे सांगितले जाते माणूस विवेबुद्धीचा वापर करून आत्मजज्ञाना पर्यन्त पोहचतो.
श्रीराम जय राम जय राम
जय जय रघुवीर समर्थ
**समास 9 वा समाप्त**

# संगतीचे जीवनात अतिशय महत्त्व

आधुनिक केसरी

आयुष्यात संगतीला फार महत्त्व असते. संगतीचा परिणाम विनासायास आणि बराचसा न कळत होत असतो. संतसंगती लाभणे ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे. ती पूर्वपुण्याईमुळेच लाभते. ज्याच्याशी आपण संगत करावी, त्याचे गुणधर्म आपल्याला येऊन चिकटतात हे आपण पाहतो. समजा, काही लोकांनी इथे यायचे ठरविले. एकाने विचार केला की आपण पायीच जाऊ, दुसरा बैलगाडीने निघाला, तिसऱ्याने आगगाडीने प्रवास केला, तर चौथा मोटारने आला. सर्वजण जर एकाच ठिकाणाहून निघाले तर साहजिकच मोटारीने येणारा सर्वात लवकर पोहोचेल; म्हणजे ज्याच्याशी संगत केली त्या वाहनाचे गुणधर्म त्याला विनासायास लाभले. संगतीची दुसरी गंमत अशी की, ज्याच्या संगतीत आपण जातो त्याच्यापुढे आपले कर्तृत्व लोप पावते. इथून पुष्कळ मुले शिक्षण घेऊन पुढे कुणी वकील झाले, तर कुणी डॉक्टर झाले. परत इथे आल्यावर त्यांनी इथल्या मुलींशी लग्ने केली. त्या मुली फारशा शिकलेल्या नसतील; परंतु



वकिलाशी लग्न केलेली वकिलीणबाई झाली, डॉक्टरशी लग्न केलेली डॉक्टरीण झाली. असे जर देहाच्या संगतीने सामान्य माणसाचेही गुणधर्म आपल्यात येतात, तर सत्संगतीचा परिणाम किती होत असला पाहिजे ! आपण तिकीट काढून गाडीत बसतो. आपल्या शेजारी कोण येऊन बसेल ते आपल्या हाती नसते. तो विडी ओढणारा असला आणि आपल्याला धूर सहन होत नसला तरी नाइलाजाने तिथेच बसावे लागते. व्यसनी किंवा विषयी माणसाची संगत ही अशी तापदायक, घातक असते. उलट सत्पुरुषाची संगत ही उत्तम, लाभदायी ठरते. सत्संगतीपासून सद्वासना आणि सद्विचार प्राप्त होतात. एखादा साधू बैरागी असेल, झाडाखाली बसला असेल. तो स्वतः उपाशी असेल तर त्याच्याकडे येणारी मंडळीही उपाशी राहतील. समर्थांकडे कुणी गेला तर ते म्हणतील, "मी भिक्षेची झोळी घेतो, तूही घे; दोघेही भिक्षा मागून आणू, आणि जे मिळेल ते शिजवून खाऊ." पण संत गृहस्थाश्रमी असेल तर आपल्याकडे येणाराला तो वाटेल ते करून खायला घालील. अन्नानुसार वासना बनते, म्हणून संताघरचे अन्न मागून घेऊन खावे. संताची देहाने संगती लाभणे सुलभ नाही. तो राहात असेल तिथून आपण लांब राहात असू; आणि जवळ राहात असलो तरी प्रपंच-कामधंद्यामुळे चोवीस तासांत त्याच्या सान्निध्यात कितीसे राहता येणार ? मग देहसंगतीचा लाभ कितीसा मिळेल ? तेव्हा नामाची संगत हीच सर्वांना सदासर्वकाळ लाभण्यासारखी उत्तम सत्संगत होय. आजचे बोधवचन आहे ९२. परमार्थ साधण्यास सत्संगती फारच उपयोगी पडते.
श्रीराम समर्थ

## श्री स्वामी समर्थ

आधुनिक केसरी




'मी करतो' ही भावना टाकून देऊन, सर्व काही तोच करीत आहे, आणि त्याची इच्छा असेल तोपर्यंत आपल्याकडून तो करवून घेत असतो, ही भावना ठेवून वागावें. त्याप्रमाणें वागू लागले म्हणजे आपोआपच विषयाची आसक्ती कमी होऊ लागते. 'मी कर्ता आहे.' ही भावना गेल्याशिवाय परमार्थ करता येणें शक्य नाही!

शुक्रवार, १४ एप्रिल २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२२१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●FIRDAY 14 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-221 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-5

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त ४थी ते ९ च्या विद्यार्थ्यांसाठी टॅलेंट सर्च परीक्षा




आधुनिक केसरी

**बीड :** ज्ञानाचा महासागर, महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 132 व्या जयंतीनिमित्त इयत्ता 4 थी ते 9 वी वर्गात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी बंसल क्लासेस, बीडच्या वतीने टॅलेंट सर्च परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परीक्षा दि. 15 व 16 एप्रिल 2023 रोजी ग्रुप 'ए' (इयत्ता 4थी, 5 वी, 6वी) व ग्रुप 'बी' (इयत्ता 7वी, 8 वी, 9वी) मध्ये होणार आहे. या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके व शैक्षणिक स्कॉलरशिप जिंकण्याची संधी मिळणार आहे. सदर परीक्षा विद्यार्थ्यांसाठी मोफत असून विद्यार्थ्यांकडून कुठल्याही प्रकारची परीक्षा फिस घेण्यात येणार नाही. बंसल क्लासेस, बीड शाखेचे संचालक डॉ. योगेश क्षीरसागर व संचालिका डॉ. सारिका क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनानुसार बीड शहरातील विद्यार्थ्यांसाठी या टॅलेट सर्च परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले आहे. दि. 15 एप्रिल रोजी सकाळी 9 व 11 तसेच दुपारी 1, 3, 5 या सत्रात ग्रुप 'ए' मधील इयत्ता 4 थी, 5 वी, 6 वीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे. तर दि. 16 एप्रिल रोजी सकाळी 9 व 11 तसेच दुपारी 1, 3, 5 या सत्रात ग्रुप 'बी'मधील इयत्ता 7 वी, 8 वी, 9 वीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे. ही परीक्षा बंसल क्लासेस, बाजीराव जगताप कॉम्प्लेक्स, डॉमिनोज् पिझ्झाच्यावर, राष्ट्रवादी भवनसमोर, बार्शी रोड बीड या ठिकाणी पार पडेल. परीक्षेत इंग्रजी 10, गणित 10 व विज्ञानाचे 10 प्रश्न असतील, एकूण 30 प्रश्नांसाठी 60 गुण व 45 मिनिटांचा वेळ असणार आहे.

ग्रुप 'ए' मध्ये परीक्षा देणाऱ्या इयत्ता 4 थी, 5 वी आणि 6 वीच्या विद्यार्थ्यांना वर्गनिहाय प्रथम 7 हजार, द्वितीय 6 हजार, तृतीय 5 हजार, चतुर्थ 3 हजार, पाचवे 2 हजाराचे रोख बक्षिसे देण्यात येणार आहे. तर ग्रुप 'बी' मध्ये परीक्षा देणाऱ्या इयत्ता 7 थी, 8 वी आणि 9 वीच्या विद्यार्थ्यांना वर्गनिहाय प्रथम 9 हजार, द्वितीय 7 हजार, तृतीय 5 हजार, चतुर्थ 3 हजार, पाचवे 2 हजाराचे रोख बक्षिसे देण्यात येणार आहे. याबरोबरच वर्गनिहाय प्रथम पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी 50% शैक्षणिक स्कॉलरशीप, द्वितीय पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी 30% शैक्षणिक स्कॉलरशीप, तृतीय पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी 15% शैक्षणिक स्कॉलरशीप व सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रत्येकी 5% टक्के शैक्षणिक स्कॉलरशिप देण्यात येणार आहे.

डॉक्टर व इंजिनिअर तथा उच्च पदस्थ अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून असलेल्या विद्यार्थ्यांसाठी बंसल क्लासेसची ही टॅलेंट सर्च परीक्षा अत्यंत महत्त्वाची ठरणार असून बीड शहरातील 4 थी ते 9 वी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या परीक्षेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बंसल क्लासेस, बीड शाखेने केले आहे.

या परीक्षेच्या मार्फत बीड शहरामध्ये असा शैक्षणिक उपक्रम राबवून बंसल क्लासेस खऱ्या अर्थाने महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देत आहे. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी 9011776480, 8308646450 या क्रमांकावर संपर्क साधावा.

# मेहनत करा यश नक्की मिळेल : प्राची डोंगरे

आधुनिक केसरी

**लातूर :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात बीसीए विभागातील तृतीय वर्षातील विद्यार्थ्यां करिता निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी विद्यार्थिनी प्राची डोंगरे (चेअरमन ऑफ द बोर्ड सुयाम एस पी झू पोलंड) या उपस्थित होत्या, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्राची डोंगरे म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली तर त्यांना जीवनात यश हमखास आहे. बी.सी.ए.पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना परदेशात नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. त्याकरिता विद्यार्थ्यांनी सॉफ्ट स्किल व प्रेझेंटेशन स्किल अवगत करण्याची गरज आहे. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्रभारी प्राचार्य डॉ.राजाराम पवार यांनी करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांनी टेक्निकल एज्युकेशन मध्ये जास्तीत जास्त संधी उपलब्ध आहेत त्या संधीचा फायदा करून घ्यावा असे नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीसीए विभाग प्रमुख शशिकांत स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. गीतांजली जोशी यांनी केले तर आभार प्रा. सुनिता





ताजनापुर ता खुलताबाद येथे आमदार श्री प्रशांतजी बंब साहेब यांच्या मार्फत राबविण्यात येत असलेल्या 200 गायी वाटपाच्या उपक्रमाच्या तयारीस सुरवात करण्यात आली असून गायी खुलताबाद येथे आणण्यास सुरुवात करण्यात आली या आलेल्या 6 गाईचे पूजन आज कैलास आश्रमाचे अभयानंदगिरीजी महाराज व नितीन महाराज परभणे,याच्या हस्ते करण्यात आले.व टप्प्याटप्प्याने 200 गायी खरेदी करून 30 एप्रिल पर्यंत सर्व गायी खरेदी करून 1 मे महाराष्ट्र दिनानिमित्त वाटपाचा कार्यक्रम करण्यात येणार असल्याचे आमदार प्रशांत बंब यानी सांगितले. यावेळी तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, माजी सभापती गणेश अधाने, ज्ञानेश्वर नलावडे, माजी उपसभापती दिनेश अंभोरे, प्रभाकर शिंदे, प्रकाश चव्हाण,अरूण आबा काळे, आबाराव पाटील काळे, आनंदा काटकर, शिवनाथ आबा काळे, मधुकर कारभारी जाधव,दिलीप होळकर, बद्रीनाथ वाकळे,आशोक पाराशर, गणेश जाधव,बालु होळकर,लक्ष्मण होळकर, सतिश पाराशर, तसेच नागरिक उपस्थितीत होते.

# वैजापूर येथील श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास व बाल संस्कार केंद्रात पुण्यतिथी निमीत कार्यक्रम

आधुनिक केसरी

**वैजापूर :** येथील श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक विकास व बालसंस्कार केंद्रात श्री, स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त दि,१२एप्रिल ते १८एप्रिल दरम्यान अखंड हरिनाम जप यज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे,या सोबत सामूहिक गुरू चरित्र पारायण,नवनाथ पारायण, श्रीपाद श्रीवल्लभ पारायण,श्रीमद भागवत पारायण,दुर्गा सप्तमी शती इत्यादी भरगच्च कार्यक्रम आरंभ झालेले आहेत,याप्रसंगी माजी नगरसेवक तथा सेवेकरी लिमेश (बापू)वाणी तसेच सुरेश आलूले,अरविंद तुपे व धोंडीरामसिंह राजपूत यांची उपस्थिती होती,,हे सर्व कार्यक्रम अत्यंत नियोजन बद्ध पध्दतीने आखण्यात आलेले आहेत,गुरू चरित्र पारायण साठी १४०सेवेकरी महिला व ८०पुरुष बसलेले आहेत,दिवस भर महिला प्रहरे व रात्र भर पुरुष प्रहरे असे नियोजन आहे, वैजापूर शहर व पंचक्रोशीतील महिला-पुरुष यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने धोंडीराम ध राजपूत यांनी केले आहे,या सप्ताहासाठी सर्व सेवेकरी सेवा देत आहेत,



# नटवरलाल आणि पिनाचिओ

आधुनिक केसरी

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी नुकतीच दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची दिल्ली येथे भेट घेतली. या भेटीवर भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते शेहजाद पुनावाला यांनी जोरदार टीका केली आहे. केजरीवाल हे भारतीय राजकारणातले नटवरलाल आणि पिनाचिओ असल्याचे ते म्हणाले. केजरीवाल यांनी गतकाळात लालूप्रसाद यादव यांच्या विरोधात केलेले ट्विट्स आपल्या पत्रकार परिषदेत पुनावाला यांनी दाखविले. “केजरीवाल यांनी आतापर्यंत अनेकवेळा वैचारीक यु-टर्न घेतलेला आहे. सुरुवातीच्या काळात त्यांनी अण्णा हजारेंना पाठिंबा दिला होता. आता एकेकाळी ज्यांच्याविरोधात त्यांनी भ्रष्टाचाराचे आरोप लावले होते. त्यांच्याशीच हातमिळवणी केली आहे.”, असा आरोप शेहनाज पुनावाला यांनी केला. भाजपा नेते शेहजाद पुनावाला पुढे म्हणाले, “तुम्ही (केजरीवाल) तेजस्वी यादव यांची भेट घेतली. लालू प्रसाद यादव यांचे नाव जमिनीच्या बदल्यात नोकरी घोटाळ्यात घेतले जात आहे. लालू प्रसाद यादव रेल्वेमंत्री असताना त्यांनी नोकरी देण्याच्या बदल्यात जमिनी घेतल्या होत्या. हा आरोप आम्ही नाही तर तुमचाच सहयोगी पक्ष जनता दलाने (युनायटेड) लावला आहे. राष्ट्रीय जनता दल आणि जनता दल (यूनायटेड) यांची युती म्हणजे चुलत भ्रष्टाचारी भाऊ. लालू प्रसाद आणि त्यांच्या मुलाने रिव्हर्स रॉबिनहूडचे उदाहरण समाजासमोर ठेवले आहे. त्यांनी गरीबांकडून चोरी करून श्रीमंतामध्ये वाटप केले. आता केजरीवाल लालू प्रसाद आणि त्यांच्या मुलाला कट्टर इमानदार असल्याचे प्रमाणपत्र देणार का? हेच प्रमाणपत्र त्यांनी सत्येंद्र जैन आणि मनीष सिसोदिया यांना दिले होते.” जमिनीच्या बदल्यात नोकरी या घोटाळा प्रकरणात ईडीने गुरुवारी लालू प्रसाद यादव यांची मुलगी चंदा यादव यांची चौकशी केली. तसेच बुधवारी लालू प्रसाद यांची मोठी मुलगी मिसा भारती आणि रागिणी यादव यांचीही चौकशी करण्यात आली होती. बुधवारीच बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यात भेट झाली होती. काँग्रेस पक्ष जेडीयू आणि आरजेडी यांच्यासोबत लढणार असल्याचे काँग्रेसने जाहीर केले. खर्गे म्हणाले की, आमची ऐतिहासिक अशी भेट झाली आहे. आम्ही अनेक विषयांवर चर्चा केली असून आगामी काळातील सर्व निवडणुका एकत्रित लढण्यासाठी देशातील सर्व पक्षांना एकत्र करण्याचा प्रयत्न करणार आहोत. खर्गे यांची भेट घेतल्यानंतर नितीश कुमार आणि तेजस्वी यादव यांनी अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानाला भेट देऊन त्यांच्यासोबत विरोधकांच्या एकजुटीबाबत चर्चा केली.

# सफरचंद कसे खावे

आधुनिक केसरी

शरीरासाठी सर्वात फायदेशीर फळ म्हणून सफरचंदाकडे पाहिले जाते आणि लहान मुलांपासून म्हाताऱ्यांपर्यंत सफरचंद नियमित खायला दिले जाते. ‘An Apple A Day, Keeps Doctor Away’ हे नेहमीच सांगितलं जातं. काही वेळा सफरचंद खाताना बियादेखील खाल्ल्या जातात. तर सफरचंदाचा रस काढताना बियांसकट काढला जातो.

पण सफरचंदाच्या बिया या विषारीच असतात असा शोध असल्याचे सांगण्यात येते. जास्त प्रमाणात बी ही विषारी : सफरचंदाची बी ही विषारीच असते हे खरं असलं तरीही त्याचे अधिक प्रमाणात सेवन केले गेल्यास, अधिक त्रास होतो. सफरचंदाच्या बी मध्ये Amygdalin नावाचे संयुग असून हे अमिग्डालिन विषारी असते. जेव्हा सफरचंदाची बी गिळली जाते तेव्हा पोटातील रसायनं त्याचा थर तोडण्यासाठी अजिबात सक्षम नसतात आणि त्याचा विरूद्ध परिणाम शरीरावर होतो.

**शरीरासाठी हानिकारक :** डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे सफरचंदाची बी खाल्ली अथवा चघळून पोटात गेली तर अमिग्डालिनचे हायड्रोजन सायनाईडमध्ये रूपांतर होते आणि हे शरीरासाठी हानिकारक ठरते. यामुळे एखाद्या व्यक्तीचा मृत्यूही होऊ शकतो.

**कसे होते नुकसान :** सफरचंदातील बियांमध्ये असणारे सायनाईड हे ऑक्सिजन थांबवते आणि काही मिनिट्समध्ये व्यक्तीचा मृत्यू होऊ शकतो. सायनाईडचे प्रमाण जास्त झाल्यास रक्तदाब वाढणे, चक्कर येणे अथवा अर्धांगवायूचा झटका येण्याचा धोका असतो. सफरचंदाचे बी खाल्ल्यास त्यातील विष सहन करण्याची शरीरात किती ताकद आहे यावर त्याचा परिणाम अवलंबून असतो. यातील विष टाळण्यासाठी तुम्ही सफरचंद खाण्याची पद्धत जाणून घ्यायला हवी. Rosacea प्रजातीच्या बियांमध्ये अमिग्लाडिन अधिक प्रमाणात असते. यामध्ये सफरचंद, पीच, चेरी, बदाम या फळांचा समावेश होतो. त्यामुळे यातील बी काढूनच कापून खाणे योग्य आहे. सफरचंद पूर्ण खायचे असल्यासदेखील त्याचे बी खाऊ नये.



कल्पना घुगे
जालना

# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर

आधुनिक केसरी

**देशहित व सामाजीक उन्नतीसाठी अहोरात्र कार्य करून,आपले संपूर्ण जीवन मानवकल्याणासाठी समर्पित करणारे महामानव म्हणजे भारतरत्न,विश्वरत्न,घटनाकार,ज्ञानवंत,बुध्दीसम्राट डॉ.बाबासाहेब आंबेडकर!**

ज्या देशाच्या समाजव्यवस्थेत मानवजातीच्या पिढ्यान-पिढ्या या वर्णभेदात,गुलामगिरीत खितपत पडल्या होत्या,मानव म्हणुन जगण्याचा ज्यांचा अधिकार नाकारून त्यांना हजारों वर्षाच्या गुलामगिरीच्या घट्ट बंदिस्त चौकटीत डांबण्यात आलं होतं,त्या मानवजातीसाठी वर्णव्यवस्थेला नाकारत,विषमतेला फाटा देत,आपल्या क्रांतीकारी आचार-विचारांनी ,मानव म्हणुन जगण्याचा अधिकार प्राप्त करून देण्याचे महान कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व होते.सामाजीक,राजकीय,शैक्षणिक,धार्मिक,आर्थिक,पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांत आपल्या उच्चकोटीच्या विचारांनी स्फुलिंग निर्माण करण्याचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले.महापुरुषांची उंची ही त्यांच्या विचारांच्या उंचीने मोजली जाते.या महामानवाने व्यक्त केलेले विचार आजही तितकेच सर्मपक आहेत व येणा-या भविष्यकाळात ही ते विचार तितकेच समर्पक असतील.समाज परिवर्तनाच्या बाबतीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील प्रत्येक व्यक्तीला संदेश देताना म्हटले आहे कि,"दुस-या व्यक्तीच्या जीवावर समाजपरिवर्तनाची स्वप्ने पाहू नका. कारण कोणी एकटा माणूस समाज परिवर्तन करणार नाही, तर समाज परिवर्तनाच्या कार्यात प्रत्येकाने सहभाग घेतला पाहिजे."समाज परिवर्तनासाठी प्रभावी साधन म्हणजे शिक्षण होय.कारण शिक्षणाने आपलं मस्तक हे सशक्त होतं. शिक्षणामुळे आपले हक्क,अधिकार,कर्तव्य यांची जाणीव होते.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते,"षंड होऊन थंड राहण्यापेक्षा,अन्याविरूध्द बंड पुकारले पाहिजे."भारतीय समाज सुधारणेत बाबासाहेबांनी आपले अनमोल असे योगदान दिले. येथील कष्टकरी,श्रमकरी,दीन-दलित,महिला यांच्या प्रश्नांना वाचा फोडून न्याय मिळवून देण्याचे कार्य केले.समाजाने आपली गुलामगिरी नष्ट करून स्वाभिमानाने जगले पाहिजे. तसेच वैज्ञानिक दृष्टीकोनातून अंधश्रध्देवर कडाडून टीका करत डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात कि,"मरणोत्तर मोक्षप्राप्ती करिता तळमळणारी वृत्ती किंवा काल्पनिक स्वर्गीय नंदनवनाकडे खिळलेली दृष्टी ही आजच्या परिस्थितीत आत्मघातकी आहे.इहलोकातील खडतर आयुष्यक्रम या भोळसट कल्पनांमुळे कष्टमय झाला आहे."



पाण्यामध्ये मासा,श्वास घेई कैसा
जावे त्यांच्या वंशा,तेव्हा कळे

या वचनाप्रमाणे भारतीय समाज व्यवस्थेचा विचार केला तर,स्त्रीयांना अतिशय हीन दर्जाची वागणूक दिली गेली. त्यांना त्यांचे हक्क अधिकार यांपासून वंचित ठेवण्यात आले.पारंपारिक धर्माच्या ठेकेदारांनी त्यांच्या जगण्याचा अधिकाराचं हिसकावून घेतला.धार्मिक अंधश्रध्दा,कर्मकांड या चक्रव्युहात गुंतवून त्यांना मानसिक गुलामगिरीत बंदिस्त करण्यात आलं.क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांनी सर्वप्रथम स्त्रीयांना शिक्षणाची दारे खुली करुन स्त्री उध्दाराचे क्रांतीकारी पाऊल उचलले. स्त्री स्वातंत्र्यासाठी त्या दिशेने महात्मा फुलेंना आपले गुरु मानत स्त्रीयांना समता,न्याय,हक्क मिळवून देण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महत्वपूर्ण तरतूदी केल्या. स्त्री ही संपूर्ण अधिकार असलेली एक माणूसच,तिला तिचे हक्क अधिकार हे मिळालेच पाहिजेत.स्त्रीयांचे हक्क अधिकार ज्या मनुस्मृतीने नाकारले,त्या मनुस्मृतीचे २५ डिसेंबर १९२७ ला महाड येथे दहन करून स्त्री स्वातंत्र्याचा श्वास मोकळा करण्याचे काम या महामानवाने केले.भारतीय समाजाला आधुनिक मुल्यांशी जोडण्यासाठी हिंदू कोडबिल आंबेडकरांनी हिंदू कोडबिलाची मांडणी केली.ज्यामध्ये स्त्रीयांना मागे खेचणा-या बंधनांना मूठमाती देण्यात आली.डॉ.बाबासाहेब म्हणत असत कि,"कोणत्याही समाजाची प्रगती ही त्या समाजातील स्त्रीयांच्या प्रगतीवरून लक्षात येते."फक्त स्त्रीयाचं नाहीत तर अखंड मानवजातीच्या उध्दाराचे कार्य या युगपुरूषाने केले. अशा या महान महामानवास जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करताना म्हणावं असं वाटतं कि, मोजू तरी कशी उंची तुझ्या कर्तृत्वाची तु जगाला शिकवलीस व्याख्या माणसातल्या माणुसकीची तू देव नव्हतास,तू देवदूत ही नव्हतास तू मानवतेची पूजा करणारा खरा 'महामानव' होतास.



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# ध्यान योग – मंथन

आधुनिक केसरी

**नुकताच एम आय टी औरंगाबादमधील परिसरात, श्री मुनिष शर्मा आयोजित एक आठवड्याच्या गीते वरील चिंतन शिबिरात सहभागी होण्याचा योग आला.इंदूरचे स्वामी आत्मानंद सरस्वती यांची गीतेचा सहाव्या अध्यायावर रोज सकाळी दोन तास अशी आठवडा भर प्रवचने होती.सहावा अध्याय ध्यान योगावर आहे.त्याला आत्मसंयम योग असेही म्हणतात.स्वामीजींनी वेदांत मिशन ची स्थापना केली असून ते वेदांत आश्रमात गुरुकुल पद्धतीने अध्यात्मावर ज्ञानदानकरतात.**


आज प्रत्येकालाच , त्यातही प्राध्यापकांना गीतेचीशिकवण जास्तगरजेची आहे.कारण संपूर्णगीता ही काय,कसे, किती,केव्हा शिकवावे याचा उत्तमवस्तुपाठआहे.आपल्या पैकी प्रत्येकाची अवस्था ही अर्जूनासारखीच असते. आपल्या समोरील युध्दाचे स्वरूप,रंगरूप वेगळे असते एव्हढेच!प्रत्येकाच्या मनात प्रश्न असतात.शंका असतात. म्हणजे जन्मभर आपण अर्जुना सारखे संभ्रमावस्थेतील शिष्य असतो.आपल्याला देखील कोणत्या ना कोणत्या स्वरूपात श्रीकृष्णाची गरज असते. शाळा कॉलेजात ल्या शिक्षक,प्राध्यापकांना तर गीतेचे अध्ययन जास्त महत्वाचे. कारण संपूर्ण गीता हा प्रश्नोत्तरी संवाद आहे. इथे प्रश्न जितके मूलभूत, गहन आहेत तितकीच त्याची भगवान श्रीकृष्णाने दिलेली उत्तरे सहज,सोपी, पटतील अशी ग्राह्य स्वरूपाची आहेत.Tयात वैचारिक गोंधळ नाही.स्पष्टता आहे.तार्किक सुसंगती आहे.

पूज्य स्वामी आत्मानंद सरस्वती यांच्या प्रवचनातून जे काही आत्मसात करता आले,मंथन करता आले ,तेअल्प बुध्दीने शब्दांकित करण्याचा हा नम्र प्रयत्न आहे.यात अपूर्णता असण्याची शक्यता आहे.खोलात जायचे तर पूर्ण गीता वाचायला हवी,ज्ञानेश्वरी वाचायला हवी.गीता हा एकमेव असा ग्रंथ आहे ज्यावर अनेक टीका,समीक्षा,भावार्थ उपलब्ध आहेत.

सहाव्या अध्यायात योगा ध्यासाचे महत्व चित्ताची एकाग्रता यावर भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला उदबोधन केले आहे.यासंबंधी अर्जुना च्याशंकांनाउत्तरेदिली आहेत.४७श्लोकाचा हा अध्याय आहे.

सहाव्या अध्यायालाविशेष महत्त्व आहे. ज्ञान,कर्म,अन् योग हे सर्व मान्य मार्ग आपल्या उन्नयनाचे.मोक्षाचे शिखर गाठण्याचे.परमेश्वराच्या जवळ जाण्याचे.भक्ती मार्ग त्या पुढचा.सहाव्या अध्यायाला गीतेचा सार मानतात.

आत्मसंयमन सर्वात जास्त महत्वाचे.आपण इंद्रिय सुखाचाच जास्त विचार करतो.आपला आनंद, आपल्या यशाच्या,सुखाच्या कल्पना या इंद्रियांना मिळणाऱ्या



शारीरिक सुखा भोवतीच भरकटत असतात. आपण शरीराचे जास्त,नको तितके लाड करतो.शरीराची देखभाल करतो.शरीराच्या आरोग्याची दखल घेतो.शरीराला आंघोळ घालतो.सारखे हात पाय धुतो. पण आतल्या मनाचे काय?आत्म्याच्या स्वच्छतेचे ,शुचीतेचे काय?मनाच्या आरोग्याकडे,वविकाराडे आपण तितकेसे लक्ष देत नाही. आध्यात्म म्हणजे आत्म्याचे अध्ययन.मन नेमके कुठे आहे असे विचारले तर नीट सांगता येणार नाही. अनेकाचा हात छाती कडे,हृदयाकडे जातो. मन ह्रुदयात नाही.मेंदूत नाही. मन आपल्या आत, कणा कणात आहे.रोमा रोमात आहे.

आत्मसंयमनाचे दोन मार्ग आहेत.कर्म योग अन् संन्यास योग.निष्काम कर्मयोगावर भगवान भर देतात. आपण फळा कडे जास्त लक्ष देतो.फळाचाच आधी स्वार्थी विचार करतो. त्यामुळे आपले मन विचलित असते.संभ्रमात असते.भीतीने ग्रासले असते. आपण इच्छित प्राप्ती साठी संयमाने कर्म करण्याच्या आधीच शस्त्र टाकून, धीर गाळून शरण जातो.अर्जुनाची तीच अवस्था झाली आहे.त्याला युध्दाच्या परिणामाची, म्हणजे end result ची जास्त चिंता आहे.त्यामुळे तो युध्दाला, आपले कर्म करायला तयार नाही.

आधी मन स्थिर करायला हवे.योगासनासाठी,ध्यान धारणेसाठी अवती भवती चे वातावरण योग्य,प्रेरक हवे. मनाच्या अन् शरीराच्या आरोग्याला ग्रहणप्रक्रियेलापोषक हवे. आपण कोणत्या तत्वा साठी लढतो,कोणत्या मुल्यांसाठी झगडतो , आपले साध्य काय हे समजून घेणे महत्वाचे आहे.एरवी आपलीकृती डळमळीतराहण्याची शक्यता जास्त.अर्जुन गोंधळलेला आहे. सुरवाती पासून तो ते स्वतःच कबूल करतोय. म्हणजे आतल्या गोंधळाची त्याला जाणीव आहे. किंकर्तव्यमुढता अशी काहीशी त्याची अवस्था आहे.करू की नको, काय करू काय नको, असे आंतरिक द्वंद्व सुरू आहे.या संभ्रमावस्थेत तो स्वतःची क्षमता च विसरला आहे..ओळखी साठी आपण आरशात बघतो.पण आरशावर धूळ असेल तर आपला चेहरा स्पष्ट दिसणार नाही. आपण स्वतःला ओळखू शकणार नाही. जत्रेत वेग वेगळ्या प्रकारचे आरसे( आकर्षणे) असतात. ते आरसे आपले विचित्र ,विद्रूप,खोटे स्वरूप दाखवतात. स्वतःची खरी ओळख करून घेण्या साठी योग्य, स्वच्छ आरशाची,भिंगाची गरज असते.भगवान श्रीकृष्ण ती गरज पूर्ण करताहेत.

या ओळखी साठी श्रुती,युक्ती,अनुभूती या त्रयी ची गरज असते.मनातील विचार विकारांना जन्म देतात. त्यासाठी थोटलेस माईंड ची कल्पना सांगितली आहे.अशा अवस्थेपर्यंत हळू हळू पायरीने पोहोचायचे.मग मन शांत होते.स्थिर होते.मन पूर्ण शांत असेल,विचार विमुक्त असेल .हे ध्यान धारणेने शक्य आहे.योग ही सुध्दा ज्ञानासाठी स्वतःला सिद्ध करण्याची एक प्रक्रिया आहे.

**उर्वरीत लेख उद्याच्या अंकात..**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739


डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांच्या 132 व्या
जयंतीनिमित्त
हार्दिक शुभेच्छा...
काकासाहेब
मुरलीधर कुऱ्हाडे
सरपंच
ग्रामपंचायत सदस्य मंगल मधुकर ठेंगडे, शमीनाबी शमशेर शेख , विठ्ठल लक्ष्मण भालेकर, आफ्रीन सिद्दिक बेग, ऐतेशाम मोहसीन बेग, बाळासाहेब निचळ, कासाबाई कोरडे, व्दारकाबाई कृष्णा कौलांगे
शुभेच्छुक : ग्रामपंचायत कार्यालय, आवलगाव, बु. ता. घनसांगी, जि. जालना


वंचित बहुजन आघाडी तर्फे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
१४ एप्रिल
११ एप्रिल
महात्मा ज्योतिबा फुले
यांच्या जयंती निमित्त
कोटी कोटी प्रणाम...
शुभेच्छुक
राजुदादा प्रधान मित्र मंडळ, फुलंब्री शहर
आकाश गंगावणे


ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन
डॉ. बाबासाहेब आंबेडकर व
क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले
यांच्या जयंती निमित्त
सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक- भगवान गंगावणे एम आय एम शहर अध्यक्ष फुलंब्री


श्री रेणुका माता यात्रेनिमित्त येणाऱ्या
सर्व भाविकांचे हार्दिक स्वागत
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांच्या जयंतीनिमीत्त
कांचन इंटरप्राईजेस तर्फे हार्दिक शुभेच्छा
प्रोप्रा.ज्ञानेश्वर जाधव
" धनश्री कुंज ", प्लॉट नं.१८, राधास्वामी कॉलनी, जटवाडा रोड,
औरंगाबाद. मो. 8888997618 / 9511729238


राजस्थानी
मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक
आपल्या स्वप्नपूर्तीसाठी, आपुलकीचा हातभार...
राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो. लि.,परळी वैजनाथ
बँकींग
आरोग्य
शिक्षण
रियल ईस्टेट
इन्शुरन्स
CERTIFIED ISO 9001:2015 COMPANY
चंदुलाल मो.बियाणी
संस्थापक अध्यक्ष, राजस्थानी मल्टीस्टेट
• मुख्य कार्यालय व मुख्य शाखा : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि.बीड मो.९१३००७२१७८/९१३००७२१८८
• कॉर्पोरेट ऑफिस व शाखा : २०५/२०६, १ ला मजला, अपना बाजार, जालना रोड, आकाशवाणी, छत्रपती संभाजीनगर, मो.९१३००७२१७६
91 दिवस मुदत ठेवीवर मिळवा 10% व्याजदर
ऑफर मर्यादित कालावधीसाठी..
181 दिवस मुदत ठेवीवर मिळवा 11% व्याजदर
ऑफर मर्यादित कालावधीसाठी..
13 महिन्याच्या कालावधीसाठी रुपये 1 लाख गुंतवणूक करा व
1000/- रुपये मासिक व्याज मिळवा
१ लाख रुपयांच्या पटीत गुंतवणूक करा व १,०००/- रुपयाच्या पटीमध्ये मासिक व्याज मिळवा
पैशाने पैसा मिळवून देणारे खाते!
करंट अकाऊंट उघडा
6% व्याजदर मिळवा
आपलं स्वप्न,होईल साकार...
स्मार्ट सेव्हिंग खाते
1 लाख + ॲव्हरेज बॅलेन्स वर 8% व्याजदर मिळेल.
दाम दुप्पट ठेव योजना
6 वर्षात दाम दुप्पट
डेली कलेक्शन सुरू करा
कर्ज घ्या
50 हजार ते 10 लाखापर्यंत कर्ज उपलब्ध
वाहन तारण कर्ज
फक्त 25%
रक्कम भरा व उर्वरीत लोन व्दारे
संकटकाळी अनेकांना, त्यांच्या सोन्याने तारलं!
सोने तारण कर्ज खरेदी कर्ज
•१२ % व्याजदर •२५ % मार्जिन भरून
आजच आपली विमा पॉलिसी काढा.
वार्षिक रू.760/- रूपयांची विमा पॉलिसी
रू.760/- भरा व अनेक फायदे मिळवा
वार्षिक रू.310/- रूपयांची विमा पॉलिसी
रू.310/- भरा व अनेक फायदे मिळवा
वार्षिक रू.50/- रूपयांची विमा पॉलिसी
रू.50/- भरा व अनेक फायदे मिळवा
वयोमर्यादा : 05 वर्षापासून ते 65 वर्षापर्यंत
Rajasthani Multistate
MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking
ग्राहक सेवा केंद्र देणे आहे.
आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे...
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप.क्रेडीट सोसा.लि.चा
तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल ४९८ बँकांशी होणार व्यवहार...
अनंत भाग्यवंत 9130072189


# लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतातील डॉ.बाबासाहेबांचे वर्णन



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**उद्धरली कोटी कुळे , भीमा तुझ्या जन्मामुळे, एक ज्ञान ज्योतीने कोटी- कोटी ज्योती, तळपतात तेजाने तुझ्याधरती वरती, अंधार तो दूर पळे... भीमा तुझ्या जन्मामुळे..., ज्यांच्या जन्मामुळे कोटी- कोटी कुळांचा उद्धार झाला. असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म रामजी व भीमाबाई यांच्या पोटी १४एप्रिल१८९१ मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. देशाच्या राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार असणाऱ्या बाबासाहेबांनी,"शिका संघटित व्हा व संघर्ष करा"असा संदेश पददलित समाजाला दिला.**



आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या दुष्ट रूढींचे उच्चाटन करून पददलित बांधवांना न्याय मिळवून देण्याचे जीवित कार्य पत्करले होते. "आपले दास्य आपणच झुगारून दिले पाहिजे"असा स्वावलंबनाचा संदेश त्यांनी स्व बांधवांना दिला. लाचारीचे जीवन जगण्यापेक्षा वतने व बलुती सोडून द्या. घाणीची कामे करण्याचे बंद करा.असा संदेश त्यांनी दिला.अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह आणि महाविद्यालय सुरू करून बाबासाहेबांनी शिक्षणाची गंगा पददलितांच्या वस्तीत नेली. कायद्याने दिलेले माणुसकीचे हक्क बजावण्यासाठी महाडच्या चवदार तळ्यावर केलेला सत्याग्रह,नाशिकच्या काळाराम मंदिरासमोर मंदिर प्रवेशासाठी केलेला सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन,व असे अनेक प्रयत्न करू नही हिंदू समाजात होणारी विटंबना टळत नाही म्हणून शेवटी केलेले धर्मांतर, समाज प्रबोधनासाठी केलेले वृत्तपत्रीय कार्य, शैक्षणिक कार्य, या सर्व कार्याच्या विचाराने प्रेरित होऊन बाबासाहेबांवर अत्यंत प्रेम करणारे लोककवी वामनदादा कर्डक यांनी हजारो गीतांतून बाबासाहेबांचे कार्य व त्यांच्या जीवनाचा आढावा घेतला आहे. बाबासाहेबांच्या जन्माचे वर्णन करताना वामनदादा म्हणतात,

जन्मले भीमाईचे बाळ
उठा गं उठा ,उठा दवंडी ही पिटा
सोन्याची आली सकाळ...

"अन्याय करणाऱ्यांपेक्षा अन्याय सहन करणारा जास्त गुन्हेगार असतो" या बाबासाहेबांच्या विचाराप्रमाणे त्यांनी अस्पृश्य समाजावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. याविषयी वामनदादा म्हणतात,

भीमा तुझ्या मताचे
जर पांच लोक असते
तलवारीचे तयांच्या
न्यारेच टोक असते ..

बाबासाहेबां सारखा विचार करणारे काही लोक जर समाजात असते तर समाजातील परिस्थिती काही वेगळीच असली असते. कदाचित दलितांवर होणारा अन्याय दिसला नसता.

शिक्षणासाठी गावापासून दूर राहणारे बाबासाहेब जेंव्हा पायी गावाकडे परत असत त्याविषयीचे वर्णन करतांना वामनदादा म्हणतात,

थांबा हो थांबा गाडीवाले दादा
करितो विनंती भिवा माझे नाव
फार दूर राहिले माझे गाव
मला गाडीत घ्या ना...

बाबासाहेबांना शिक्षणाची खूप आवड होती. परंतु सुरुवातीच्या काळात त्यांना शिक्षणासाठी शाळेमधून विरोध झाला. प्रसंगी शाळेच्या बाहेर थांबावे लागले. तेंव्हा त्यांच्या मनाची झालेली घालमेल वामनदादांनी पुढील ओळीतून व्यक्त केली आहे.

गुरुजी मजला शाळेत घ्या ना,
बाहेर राहू कसा ?
घरी मी ,परतून जाऊ कसा ?

बाबासाहेब नेहमी म्हणायचे,"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. व जो ते प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही."म्हणूनच त्यांनी शिक्षणासाठी प्रचंड मेहनत घेतली. कंदीलाच्या दिव्यात १८ -१८तास अभ्यास केला. पुस्तकांवर त्यांचे खूप प्रेम होते. अर्धपोटी राहून त्यांनी अनेक पुस्तके विकत घेतली. ते म्हणत,"जर तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची भाकरी घ्या व एक रुपयाचे पुस्तक घ्या. भाकरी तुम्हाला जगवेल व पुस्तक तुम्हाला कसे जगायचे हे शिकवेल. बाबासाहेबांनी जसे पुस्तकांचे वाचन केले तसेच अनेक ग्रंथ व




वर्तमानपत्रांमधून लिखाणही त्यांच्या लेखणी प्रखर व धारदार होती. त्यांच्या लेखणीचे वर्णन सुद्धा वामनदादांनी केले आहे,

जगात मी देखणी
जगातली देखणी
गं बाई मी ,भिमाची लेखणी

या लेखणीने अस्पृश्य समाजाच्या मनात शिक्षणाची ज्योत पेटवली. त्यांना होणाऱ्याअन्यायाची जाणीव करून दिली. त्यामुळेच वामनदादांनी आपल्या गीतात म्हटले आहे,

भिमराया घे तुझ्या या
लेकराची वंदना
आज घे ओथंबलेल्या
अंतराची वंदना...

एका गीतात वामनदादा म्हणतात,

आई तुझा मी नंदन आहे
पायी तुझ्या हे वंदन आहे
हेच वंदन मानवतेचे
बंधन आहे...

बाबासाहेबांच्या विचाराप्रमाणे ग्रंथ हेच गुरु आहेत. वाचाल तर वाचाल. कारण वाचनानेच माणसाच्या बौद्धिक विकास होतो. त्याला आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होते. कारण बाबासाहेब म्हणायचे," अन्याय करणाऱ्या पेक्षा अन्याय सहन करणारा जास्त गुन्हेगार असतो"आपल्या भारत देशातील बहुसंख्य लोक हे धार्मिक वृत्तीचे आहेत. मंदिरात जाऊन देवाचे दर्शन घेणे व त्याच्यावरच सारे काही सोडून देणे अशाही वृत्तीचे काही लोक आहेत. परंतु बाबासाहेबांना हा विचार मान्य नव्हता. ते म्हणत,"विश्वास देवावर नाही तर स्वतःच्या मनगटावर ठेवा."कारण त्यांना हे माहीत होते व त्यांनी ते बोलून ही दाखवले होते की,"मंदिरात जाणाऱ्या लोकांच्या रांगा जेंव्हा वाचनालयाकडे जातील त्या दिवशी माझ्या देशाला महाशक्ती बनण्यापासून कोणीच रोखून शकणार नाही."बाबासाहेबांचे कार्य खरोखरच सर्व समाजासाठी प्रेरणादायी आहे. दिन दुबळ्या जनतेसाठी बाबासाहेब कसे होते हे आपल्या कवितेतून सांगताना वामनदादा म्हणतात,

चंदनाची छाया, कापराची काया
माऊलीची माया होता,
माझा भिमराया...

हे आणि असे अनेक गीते वामनदादांनी लिहिली व नुसती लिहिलीच नाही तर ती सर्व लोकांपर्यंत आपल्या आवाजातून पोहोचवली. या गीतांमधून त्यांचे बाबासाहेबांविषयी असलेले प्रेम व जिव्हाळा व्यक्त होताना दिसतो. महामानव बाबासाहेबांना व या सुंदर गीतांची रचना करणाऱ्या लोककवी वामनदादा कर्डक यांस माझे विनम्र अभिवादन...

# प्रखर देशभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर !



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**अठराव्या शतकात इमॅन्युएल काण्ट या जर्मन तत्ववेत्याने, "कोणत्याही स्वतंत्र राष्ट्रात जेव्हा व्यक्तिस्वातंत्र्याची योग्य पाठराखण होऊ लागते, तेव्हाच ते राष्ट्र खऱ्या अर्थाने स्वतंत्र बनते" अशी राष्ट्रवादाची व्याख्या करून राष्ट्रवाद संकल्पना स्पष्ट केली. शिवाय जागतिक स्तरावर विचारवंतांनी राष्ट्रवाद संकल्पनेच्या विविध व्याख्या केल्या आहेत. भारतीय राष्ट्रवादाची सुरुवात एकदम अलीकडच्या काळातली आहे. त्याचे कारण म्हणजे भारत देश हा विविध राजेशाही सत्तांनी ज्याच्या त्याच्या राज्यापुरत्या अस्मिता जागृत ठेवून होता. या खंडप्रायतेमुळेच इंग्रजांनी 'फोडा आणि राज्य करा' या धूर्त नीतीने भारतावर दिडशे वर्षे राज्य केले. विसाव्या शतकात शिक्षित लोकांना 'राष्ट्र' संकल्पना माहित झाली आणि भारताला राष्ट्रवाद कळला.**

भारत हा एकसंध देश असावा अशी देशभक्तीची भावना ब्रिटीश सत्ता काळात खऱ्या अर्थाने रुजली गेली.

याच अनुषंगाने आधुनिक भारताचे अध्वर्यू आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय राष्ट्रवाद-देशभक्ती संबंधी प्रखर-निष्ठावंत विचार स्वातंत्र्यपूर्व आणि नंतरच्या काळात देशाला तारक ठरले. देशभक्ती आणि राष्ट्रवाद अनुषंगाने डॉ.आंबेडकरांनी भारतीय लोकशाहीला सर्वकाळ प्रभावित केले आहे. बाबासाहेबांची देशभक्ती आणि राष्ट्रवाद किती प्रखर होता( ?) या विषयी नरहर कुरुंदकर लिहितात, "आमच्या स्वातंत्र्य आंदोलनाने आधुनिक राष्ट्रवाद निर्माण केला आहे. तो संविधानात ग्रंथित आहे. याचा अर्थ भारतीयत्व स्वातंत्र्यापूर्वीपासूनच अस्तित्वात होते म्हणून तर आपण स्वातंत्र्याची आकांक्षा धरू शकलो, स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करू शकलो आणि ती राज्यघटना लिहिण्यासाठी मनुवादी भारतीयांनी कोणाची निवड केली? तर, ज्यांच्यावर प्रतिक्रांतिवाद्यांनी शतकानुशतके सामाजिक अन्याय केला त्या समाजाचे नेते व प्रतिनिधी असणाऱ्या व अन्यायासाठी जबाबदार असणाऱ्या 'मनुस्मृती'चे दहन करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ! म्हणूनच 'एका हातात राज्यघटना व दुसऱ्या हातात मनुस्मृती असे चालणार नाही,' ही बाबासाहेबांची घोषणा भारतीयत्वाची आधारशिला बनली आहे." म्हणजे राज्यघटना लिखाण करण्यापर्यंतचा डॉ.आंबेडकरांचा प्रवास किती काठीनप्राय होता ( ?), जातीयतेचे चटके देवून इथल्या बुरसटलेल्या व्यवस्थेने त्यांना जाळायचेच शिल्लक ठेवले असतांनासुद्धा बाबासाहेबांच्या हृदयातील राष्ट्रप्रेम आणि देशांतील शेवटचा वंचित-शोषित जीव कसा सुखी होईल( ?) याचा अहोरात्र विचार म्हणजे त्यांचा खरा राष्ट्रवाद !

ब्रिटिशांनी भारतीयांना मूर्ख बनवले. इथे जात, धर्म, पंथ आणि वंशाच्या स्वार्थी अस्मिता राज्य करत होत्या. राष्ट्र, राष्ट्रप्रेम, एकजूट, एकसंध देश ह्या राष्ट्रवादी संकल्पना विचारवंत, क्रांतिकारी महापुरुषांनी भारतीयांच्या मनामनात रुजविल्या आणि मग भारत एक 'आसेतु हिमाचल' राष्ट्र आहे अशा एकजुटीच्या भावनेचे वारे देशभर वाहू लागले. वंदे मातरम!, भारत माता कि जय!, जय हिंद! सारखे नारे देशभर घुमू लागले! या देशभक्तीच्या महान कार्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा वाटा सिंहाचा आहे! डॉ.आंबेडकरांच्या मते 'राष्ट्रवाद' संकल्पनेला अनेक पैलू असून देशकाल परिस्थितीनुसार अनेक परिमाणे आहेत. फुले, आगरकर आणि आंबेडकर यांचा 'विवेकनिष्ठ राष्ट्रवाद' भारत देशाचा अंतःप्रवाही झाला हे विशेष! बाबासाहेबांना भारतीय समाज, इतिहास, धर्म, कला, संस्कृती यांचा सखोल अभ्यास होता, म्हणूनच, "केवळ भौगोलिक आकार असलेला देश म्हणजे राष्ट्र नव्हे, समान भाषा, वंश, श्रद्धा, अस्मिता म्हणजे राष्ट्र नव्हे. उलट राष्ट्र ही एक वस्तुनिष्ठ समूह भावना आहे. ती सद्सद्विवेकशक्तीची भावना आहे" हे बाबासाहेबांचे विचार वाचल्यावर त्यांचा प्रगल्भ राष्ट्रवाद समोर येतो. मानवी समूहातील एकात्मतेची, आपलेपणाची भावना म्हणजे राष्ट्रवाद! विविध धर्म, भाषा, श्रद्धा जपून हा देश माझा आहे आणि मी या देशाचा आहे! अशी सदैव धमन्यातून वाहणारी तेजोमय सळसळ म्हणजे राष्ट्रवाद!

डॉ.आंबेडकरांनी प्रगल्भ आणि प्रखर देशभक्ती, राष्ट्रवाद संकल्पना मांडतांना सर्वंकष शोषणन्मुक्ती केंद्रस्थानी होती. शोषित-वंचित समूह शोषणमुक्ती शिवाय राष्ट्रीय प्रवाहात सामील होणार नाहीत. जोपर्यंत त्यांना हे राष्ट्र माझे आहे, मला समानतेने वागणूक देते हे पटणार नाही तो पर्यंत ते लोक भारतीय स्वातंत्र्य चळवळीत समरस होणार नाहीत, परिणामी बाबासाहेब सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्याबरोबरच धार्मिक समता-स्वातंत्र्यासाठी आग्रही होते. असहिष्णुता, वंश, जात, धर्म, पंथ अस्मितेने लोकांमध्ये राष्ट्रप्रेम-राष्ट्रभावना कशा जागृत होतील? असे बुद्धीप्रामाण्यवादी, विवेकी प्रश्न उभे करून लोकांना राष्ट्रवादासंबंधी जागृत




केले. कालबाह्य संस्कृती, परंपरा, अतिरंजित गौरव, अविवेकी-एकांगी-कट्टरता देशाला नेहमी मारक असते. यासाठी महात्मा ज्योतीराव फुले यांच्या 'सार्वजनिक सत्यधर्म' ग्रंथातील "या बळीस्थानातील एकंदर शुद्रातीशुद्रांसह भिल्ल, कोळी वगैरे लोक विद्वान होऊन विचार करण्यालायक होईतो, ते सर्व सारखे एकमय लोक झाल्याशिवाय भारत राष्ट्र (नेशन) होऊ शकत नाही" असा सामाताधीष्टीत आणि प्रगल्भ राष्ट्रवाद मांडला. देश स्वतंत्र झाल्यावर बाबासाहेब कायदा मंत्री असतांना हैदराबादचा निजाम स्वतंत्र रहायच्या हालचाली करत होता, त्याने बाबासाहेबांना युनोमध्ये दाद मागण्यासाठी वकीलपत्र द्यायचे ठरवले होते, परंतु निजामाची ती मागणी धुडकावून लावत बाबासाहेबांनी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि संरक्षणमंत्री सरदार पटेल यांना समजावून सांगून निजामावर 'मिलिटरी' पाठवली, त्याला 'पोलीस एक्शन' नाव दिले आणि निजामाला शरणांगती पत्करायला भाग पाडले आणि मग मराठवाडा स्वातंत्र्याच्या एक वर्ष एक महिना दोन दिवसांनी म्हणजे १७ सप्टेंबर १९४८ रोजी खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला! हा बाबासाहेबांचा खरा राष्ट्रवाद आणि प्रखर देशभक्ती!

सांप्रतकाळी तरुण आणि देश वाशियांनी आपल्यामध्ये प्रखर देशभक्ती, सामाजिक ऐक्य, धर्म सहिष्णुता इत्यादी मुलभूत-दूरदृष्टी संकल्पना रुजविणे गरजेचे आहे. कोणतीही कट्टरता ही राष्ट्र आणि एकसंध राष्ट्रभावनेला मारक असते याचे देशातील सर्वपक्षीय राजकारणी ते सामान्य माणूस यांनी नित्य भान ठेवले पाहिजे. आपला देश जगात महासत्ता म्हणून उदयास येतांना धार्मिकता किंवा कट्टरता जर डोके बाहेर काढत असेल तर ती धोक्याची घंटा आहे! ही राष्ट्र आणि राष्ट्रवाद या भावनेची प्रतारणा आहे. इथे भारतीय नागरिकाला प्रकर्षाने याची जाणीव झाली पाहिजे की; मी हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, शिख, इसाई नसून प्रथम भारतीय आहे! हा देश माझा आहे! इथे मी, माझं कुटुंब, माझा धर्म, माझी संपत्ती सुरक्षित असून वेळप्रसंगी, आपत्तीच्यावेळी या देशासाठी शूर-विरांसारखे बलिदान द्यायला, माझे सर्वस्व अर्पण करायला मी तयार आहे! ही राष्ट्रभावना सतत तेवत राहिली पाहिजे! यासाठी आपण सर्वजण मिळून प्रार्थना करूयात की; मी कुणाचाच जात, धर्म, वंश, पंथ यावरुन द्वेष करणार नाही. आपण सारे, सदैव भारतीय आहोत याचे भान ठेवीन! हा मुलभूत विचार समाजामध्ये रुजला की; मग भारत देश महासत्ता होऊन दैदिप्यमान शिखरावर जाईल! हेच अलौकिक स्वप्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पहिले होते! चला तर मग, डॉ.आंबेडकरांचे देशभक्ती-राष्ट्रवादाचे हे स्वप्न पूर्ण करून त्यांच्या जयंतीनिमित त्यांना विनम्र अभिवादन करूयात ! जय हिंद ! जय भारत ! जय भीम !

# फ्लेमिंगोचे जायकवाडी जलाशयावर आगमण

आधुनिक केसरी

**दादासाहेब घोडके**

पाहुण्या पक्षाचे मुख्य आकर्षण जायकवाडी जलाशयावर नेहमी राहीले असुन या वर्षी उशीराने प्लेंमिंगो ( रोहीत ) पक्षाचे आगमण सध्या झाले असल्याचे दिसते. असंख्य पक्षात सर्वात देखण्या व डौलदार अशा फ्लेमिंगो पक्ष्याचे यंदाच्या मोसमात प्रथमच दर्शन झाले आहे. पैठण येथील पक्षीमित्र सुनील पायघन यांनी यास दुजोरा देताना सांगितले की, गेल्या दोन दिवसापासून या जलाशयात फ्लेमिंगो पक्षी आढळून आले आहेत. फ्लेमिंगो हा पक्षी चार फुटांपेक्षा जास्त उंचीचा आणि पंखांवर केशरी रंगाची छटा असणारा आहे. फ्लेमिंगोला मराठीत 'रोहित' आणि संस्कृतमध्ये 'अग्निपंख' असे संबोधले जाते. त्यांचे मूळस्थान भारत-पाक सीमेवरील कच्छच्या आखातात असून अन्नाच्या शोधार्थ ते भारतातील सरोवरे, तलाव, खाड्या यांच्या दिशेने झेपावतात. त्यात पैठण च्या जायकवाडी जलाशयावर हे पक्षी दरवर्षी खूप मोठ्या संख्येने येतात. त्यामुळे या पक्षाच्या कवायती बघण्यासाठी पक्षी प्रेमी नाथसागरावर पक्षाना बघण्याचा आनंद घेतात.



# महावितरणचे जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांना कार्यगौरव पुरस्कार



महावितरणचे जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांना पत्रमहर्षी स्व .मोहनलालजी बियाणी कार्यगौरव पुरस्कार प्रदान करताना सहकारमंत्री अतुल सावे . सोबत पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी, संपादक जगदीश बियाणी आदी .

आधुनिक केसरी

छत्रपती संभाजीनगर : महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांना सहकारमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पत्रमहर्षी स्व.मोहनलालजी बियाणी कार्यगौरव पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व दैनिक मराठवाडा साथीच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे एका खास समारंभात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पत्रकारांसह जनसंपर्क अधिकाऱ्यांनाही सन्मानित करण्यात आले. जनसंपर्कातील उत्कृष्ट कामगिरीसाठी ज्ञानेश्वर आर्दड यांना पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी, संपादक जगदीश बियाणी, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रभू गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. आर्दड हे दशकभराहून अधिक काळ महावितरणमध्ये कार्यरत असून, त्याआधी त्यांनी हैदराबाद, नागपूर, छत्रपती संभाजीनगर व जालना येथे वृत्तवाहिनी, आकाशवाणी व विविध वृत्तपत्रांत पत्रकार म्हणून काम केलेले आहे. या पुरस्काराबद्दल आर्दड यांचे महावितरणचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले, मुख्य अभियंता सचिन तालेवार यांच्यासह अधिकारी-कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



# मुलांसाठी शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी IAHV सह गुडइयर इंडिया भागीदार

आधुनिक केसरी

छत्रपती संभाजीनगर : घाणेगाव ( छत्रपती संभाजीनगर ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये शालेय पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करून शिक्षणासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी गुडइयर कार्यरत आहे. घाणेगाव, महाराष्ट्र- गुडइयर इंडियाने 'ॲडॉप्ट अ स्कूल' प्रकल्पांतर्गत घाणेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ ह्युमन व्हॅल्यूज (IAHV) सोबत भागीदारी केली. गुडइयर, नेहमीप्रमाणेच, ग्रह आणि लोकांचे संरक्षण करण्यासाठी नैतिक आणि शाश्वत पद्धतींसाठी वचनबद्ध आहे; समाजाला परत द्या; एक सुरक्षित, वैविध्यपूर्ण आणि निरोगी कार्यस्थळ प्रदान करा; आणि या प्रयत्नांमध्ये आमच्या सहयोगींना सहभागी करून घ्या. आपल्या ग्राहकांना तांत्रिकदृष्ट्या अग्रगण्य आणि नाविन्यपूर्ण उत्पादने प्रदान करण्यासोबतच, कंपनी सामाजिक, नैतिक आणि पर्यावरणदृष्ट्या जबाबदार कॉर्पोरेट घटक बनण्याचा सतत प्रयत्न करत आहे.

गुडइयर इंडियाने हस्तक्षेप केलेला असाच एक सामाजिक कारण म्हणजे शिक्षण. भारतातील शाळा खराब पायाभूत सुविधा, गळतीचे प्रमाण आणि कमी शिक्षण परिणाम यासारख्या समस्यांशी संघर्ष करत आहेत. 2021-22 च्या शिक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, भारतातील 6.5% शाळांमध्ये शाळेच्या परिसरात हात धुण्याची सुविधा नाही ज्यामुळे विद्यार्थ्यांसाठी अस्वच्छ परिस्थिती निर्माण होते. पुढे, केवळ 21% शाळांमध्ये शाळेच्या आवारातच रेनवॉटर हार्वेस्टिंग युनिट बांधण्यात आले होते. देशात जलसंधारण आणि पावसाचे पाणी साठवण्यावर सरकारचा जोरदार जोर असूनही हे आहे. या राष्ट्रीय चिंतेने प्रेरित होऊन गुडइयर इंडिया समर्थन करत आहे ,भारतातील शाळा खराब पायाभूत सुविधा, गळतीचे प्रमाण आणि कमी शिक्षण परिणाम यासारख्या समस्यांशी संघर्ष करत आहेत. 2021-22 च्या शिक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, भारतातील 6.5% शाळांमध्ये शाळेच्या परिसरात हात धुण्याची सुविधा नाही ज्यामुळे विद्यार्थ्यांसाठी अस्वच्छ परिस्थिती निर्माण होते.

पुढे, केवळ 21% शाळांमध्ये शाळेच्या आवारातच रेनवॉटर हार्वेस्टिंग युनिट बांधण्यात आले होते. देशात जलसंधारण आणि पावसाचेपाणीसाठवण्यावरसरकारचाजोरदारजोरअसूनहीहेआहे. या राष्ट्रीय चिंतेने प्रेरित होऊन, गुडइयर इंडिया मुलांसाठी शिकण्याचे वातावरण तयार करण्यात मदत करत आहे. त्याच अनुषंगाने जिल्हा परिषद घाणेगाव प्राथमिक शाळा 'ॲडॉप्ट अ स्कूल' प्रकल्पाच्या छत्राखाली घेण्यात आली. संपूर्ण पायाभूत सुविधांचे नूतनीकरण, स्वच्छता सुविधा, मनोरंजन क्षेत्रे आणि शाळेला रेनवॉटर हार्वेस्टिंग युनिटसह सुसज्ज करणे यासह सुविधा सुधारण्यासाठी टीमने अथक परिश्रम घेतले. प्रकल्पामुळे, विद्यार्थ्यांना आता ई-लर्निंग सक्षम वर्गखोल्यांद्वारे शालेय शिक्षणाचा एक तल्लीन अनुभव मिळू शकतो.

गुडइयरचे कार्य सर्वांसाठी सर्वसमावेशक आणि समान दर्जाचे शिक्षण सुनिश्चित करण्याच्या जागतिक शाश्वत विकास लक्ष्य (SDG) 4 शी संरेखित करते, 2015 मध्ये संयुक्त राष्ट्र (UN) महासभेने वचनबद्ध केलेल्या 17 जागतिक उद्दिष्टांपैकी एक. 7 एप्रिल 2023 रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घाणेगाव येथे मुलांसाठी नूतनीकरण केलेल्या शिक्षण सुविधांचा शुभारंभ समारंभ आयोजित करण्यात आला होता.

गंगापूरचे माननीय तहसीलदार सतीश सोनी आणि रमेश अल्वा यांच्यासह गुडइयरचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.






# अब्दुल कादर कॉलनी नागरी सुविधापासुन वंचित

आधुनिक केसरी

फुलंब्री शहरातील खुलताबाद रोडवरील वार्ड क्रमांक 15 मधील अब्दुल कादर कॉलनी मध्ये मुस्लिम समाज राहतो.परंतु गेल्या पाच वर्षांत एकदाही भारतीय जनता पार्टी च्या आताच्या माजी नगराध्यक्षांनी व नगरसेवकांनी या कॉलनीतील रहिवाशांकडे समस्या संदर्भात पाहिले नाही.

या पुर्वी या वस्तीतील नागरिकांनी सत्ताधारी भाजपाच्या माजी नगराध्यक्षांना निवेदने दिली तसेच वेळोवेळी सांगितले.परंतु डोक्यात जातीवादचा विचार ठेवत जाणूनबुजून या अब्दुल कादर कॉलनीतील रहिवाशांकडे दुर्लक्ष केले.

नागरी सुविधा उपलब्ध नसल्याने येथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

कॉलनी मध्ये ड्रेनेझ लाईन,नल कनेक्शन, सांडपाणी सोडण्यासाठी नाल्या नाही. विजेची खांबे नाही अशा विविध समस्या आहे.या समस्या कडे जाणुन बुजून दुर्लक्ष केले जात आहे .

**अब्दुल कादर कॉलनीतील समस्या लवकर सोडवा**

फुलंब्री शहरातील खुलताबाद रोडवरील अब्दुल कादर कॉलनी मध्ये मुस्लिम वस्ती आहे तिथे कोणत्याही प्रकारची नागरी सुविधा उपलब्ध नाही या गंभीर समस्या संदर्भात नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक ऋषिकेश भालेराव यांनी दखल घ्यावी .

– **भगवान गंगावणे**, ए आय एम आय एम शहराध्यक्ष फुलंब्री जिल्हा औरंगाबाद



फुलंब्री शहरातील अब्दुल कादर कॉलनीत गेल्या पंधरा ते वीस वर्षांपासून कोणत्याही प्रकारची नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात आले नाही . स्थानिक नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते आहे . गल्लीतील सिमेंट रस्ते फुटले , नल कनेक्शन नाही , ड्रेनेज लाईन नाही . नाईलाजाने गटाराचा पाणी गल्लीत सोडण्यात येत आहे . विजेची खांबे नाही अशा विविध समस्या निर्माण झाली आहे . याकडे फुलंब्री नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक ऋषिकेश भालेराव यांनी दखल द्यावे अशी मागणी आम्ही अब्दुल कादर कॉलनीतील नागरिक करीत आहेत .

**शफीक सिद्दीकी**, रा . अब्दुल कादर कॉलनी फुलंब्री

आता सध्या फुलंब्री नगरपंचायत प्रशासक तथा मुख्याधिकारी ऋषिकेश भालेराव यांच्या ताब्यात आहे. प्रशासकीय अधिकारी यांच्या ताब्यात नगरपंचायत आल्याने कामाचा ताण वाढला असे बोलले जात आहे. **शहरात इतरही वाड्या वस्त्या आहे तिथे नागरी सुविधा उपलब्ध पण अब्दुल कादर कॉलनीत का नाही ?**

फुलंब्री शहरात गेल्या पाच ते दहा वर्षांत अनेक बदल झाले असे बोलले जात आहे , विकासाची अनेक कामे केली जात आहे.

**शहरातील दुरवरच्या वाड्या वस्त्यांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करून दिली**

जाते मग फुलंब्री शहरातील वार्ड क्रमांक 15 मधील खुलताबाद रोडवरील अब्दुल कादर कॉलनीत नागरी सुविधा उपलब्ध करून का दिली जात नाही असा प्रश्न येथील स्थानिक नागरिक करीत आहेत.

तसेच या प्रकरणी माजी नगरसेवक अजय शेरकर यांनाही वेळोवेळी या सगळ्या प्रकरणी सांगितले गेले आहे तेही हात झटकून टाकतात.

अब्दुल कादर कॉलनीत नागरी सुविधा उपलब्ध करुन न दिल्यास धरणे आंदोलन करण्यात येईल.

# विधवांना गं. भा. संबोधण्यामागे मनुवादी भाजपा सरकारचा हीन हेतू : अतुल लोंढे

आधुनिक केसरी

मुंबई : आधुनिक युगात महिलांनी सर्वच क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केलेली आहे पण आजही समाजातील काही घटक महिलांच्या प्रगतीत अडथळे निर्माण करत असतात. महिलांचे विश्व 'चुल आणि मुल' एवढेच मर्यादित असावे अशा बुरसटलेल्या विचारसरणीच्या मनुवादी भाजपा सरकारने पुन्हा एकदा महिलांचा अपमान केला आहे.

विधवांना गं. भा. संबोधण्याचा प्रस्ताव आणण्याच्या हेतूमागे महिलांचा सन्मान नसून महिलांना अपमानित करण्याचा मनुवादी हीन हेतू असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला आहे. यासंदर्भात बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, महिला व बालविकास मंत्री अतुल लोंढे १२ एप्रिल रोजी एक पत्रक काढून 'महाराष्ट्रातील विधवा महिलांना सन्मान

## मंगल प्रभात लोढा मंत्री म्हणून पुरोगामी महाराष्ट्राला लागलेला कलंक

मिळवून देण्याकरिता विधवा ऐवजी गंगा भागिरथी (गं. भा.) हा शब्द वापरण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव' तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. असा प्रस्ताव करण्यामागे मंत्री मंगल प्रभात लोढा व त्यांच्या पक्षाचा हेतू काय आहे हे पुरोगामी महाराष्ट्राला माहित आहे. गं. भा. म्हणून विधवांचा सन्मान होतो हेच मुळात चुकीचे आहे. महिला वर्गातूनही यावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. महिलांच्या कल्याणासाठी, त्यांच्या सक्षमिकरणासाठी भाजपा सरकार काय 'दिवे' लावत आहे हे दिसून येतच आहे. महिलांबाबत भाजपाच्या 'अतिवरिष्ठ' नेत्यांची भाषा ही नेहमीच अत्यंत हीन दर्जाची व महिलांचा अपमान करणारी असते. भाजपाची मातृसंस्था RSS महिलांबाबत काय दृष्टीकोन बाळगून आहे हे नव्याने सांगण्याची गरज नाही. महाराष्ट्राला थोर समाजसुधारक, संत, महापुरुषांचा वारसा लाभलेला आहे. समाजातील अनिष्ठ रुढी, परंपरांच्या विरोधात तसेच महिलांच्या बाबतीत असलेल्या कुप्रथा, अनिष्ठ चालीरीती बंद व्हाव्यात म्हणून मोठा संघर्ष केलेला आहे. मागील वर्षीच कोल्हापूर जिल्ह्यातील हेरवाड ग्रामपंचायतीने विधवाप्रथा बंद करण्याचा क्रांतीकारक निर्णय घेत नवा आदर्श घालून दिला आहे. अनेक वर्षांच्या संघर्षातून महिला आज समाजात सन्मानाने जगत आहेत. परंतु मनुवादी, महिलांबद्दल दुजाभाव करणारी मानसिकता आजही समाजात आहे, दुर्दैवाने अशा मानसिकतेचे लोक महाराष्ट्र सरकार चालवतात हे त्यातून गंभीर व दुर्दैवी आहे. महिला व बाल विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी महाराष्ट्रातील महिलांची माफी मागून हा प्रस्ताव रद्द करावा अशी मागणी लोंढे यांनी केली आहे.

# स्नेहसमेलनातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होत असते - धोंडिरामसिंह राजपूत

आधुनिक केसरी

**वैजापूर** : शालेय व महाविद्यालययीन जीवनातील विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनातून त्यांच्या भावी आयुष्याची निकोप,निरोगी,जडणघडण होऊन एक आदर्श व जबाबदार व्यक्तिमत्व साकारत असते असे प्रतिपादन मंगळवार(ता,११) रोजी माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपुत यांनी रवंदे येथील शाळेत आयोजित "कलाविष्कार"या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात केले,त्यांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या शिक्षणकडेअधिकचे लक्ष देण्याचे आवाहन केले,या प्रसंगी कोपरगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक वासुदेव दिसले यांनी शिक्षकांच्या कार्य कर्तृत्व चे कौतुक केले, कोपरगावच्या गट शिक्षणाधिकारी शबाना शेख यांनीही मुलांच्या कला गुणांचे कौतुक केले तसेच चरणसिंह काकरवाल यांनीही शिक्षक वर्गाला धन्यवाद दिले. या कार्यक्रमात मुलां-मुलींनी विविध कला कौशल्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली,अत्यंत बहारदार असलेला हा कार्यक्रम तीन तास चालला, कार्यक्रम सूत्र संचलन शिक्षक सोमनाथ मांडाळकर यांनी केले ,या प्रसंगी केंद्र प्रमुख विद्याताई भोईर,मुख्याध्यापक ए,आर,हिरवळे, श्री ,पवार सर,श्री थोरात सर व शाळेतील शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.




# डॉ. अश्रू जाधव यांची समाजशास्त्र अभ्यास मंडळावर नियुक्ती

आधुनिक केसरी



यवतमाळः जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा जि. यवतमाळ येथील प्राचार्य डॉ. अश्रू जाधव यांची समाजशास्त्र अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे कुलगुरू नामीत प्रतिनिधी म्हणून निवड नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. अश्रू जाधव यांचे समाजशास्त्रीय आकलन, सामाजिक कार्यातील योगदान आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे वाङ्मयातील अभ्यास सर्वश्रूत आहे. ते विद्यार्थी जडणघडणीत विविध प्रयोग करीत शैक्षणिक कार्यात त्यांचा नावलौकिक आहे. या कार्याची दखल घेत प्राचार्य डॉ. अश्रू जाधव यांची समाजशास्त्र अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे कुलगुरू नामीत प्रतिनिधी म्हणून निवड नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.












# डॉक्टर आंबेडकर एक विचारधारा

आधुनिक केसरी

**एका सामान्य घरातून आपल्याच सारख्या सामान्य मातीत जन्मलेला अतिसामान्य मुलगा भीमराव. आज फक्त भारतात नाही जगभरात ज्यांची ओळख आहे ते डॉक्टर भीमराव आंबेडकर. एक असा मुलगा ज्याला फक्त शिक्षण घ्यायचं या उल्हासाने तो शाळेत गेला, पण फक्त एका विशिष्ट जातीत जन्माला आला म्हणून वर्गाच्या बाहेर बसवलं गेलं.**




एक असा मुलगा ज्याला नुसतं विनापरवानगी विहिरीतलं पाणी काढले म्हणून कैद्यागत लाथा बुक्क्यांनी मारलं गेलं,, शाळेत असताना एका विशिष्ट उंचीवरून ओंजळीत पाणी ओतलं गेलं काय तर म्हणे अछूत.

तो इतका अभद्रकाळ होता की त्या छोट्याशा बालमनाला जिथे हाडा मासाच्या माणसांव्यतिरिक्त दुसरी जात कळत नव्हती तिथे जातीपातींच्या भिंतीत अडकवून त्याच्या पडसावली पासून दूर थांबणारी लोक त्यांना भेटली.

पण त्रास झाला की समाधान भेटतं आणि अति त्रास झाला की संशोधन होतं,हेच संशोधन डॉक्टर भीमराव आंबेडकर यांच्या रूपाने भारताला मिळालं महाराष्ट्राच्या रत्नागिरीमध्ये जन्मलेल्या डॉक्टर भीमराव आंबेडकर यांनी त्या सगळ्या सीमा बंधनांना तोडून फेकलं जा त्यांना स्वातंत्र जगण्यापासून रोखत होत्या.

एकेकाळी जिथे शाळेत बसण्यासाठी ज्याला दंगल लढावी लागत होती त्याच माणसाच्या बुद्धीच्या जोरावर बनलेलं भारतीय संविधान आज आपण सगळे शिरोधार्य मानतो. त्यांनी लिहिलेल्या द प्रॉब्लेम ऑफ रुपीज पुस्तकावर आधारित आरबीआय ची स्थापना करण्यात आली.

हे तर फार छोटं झालं जगभरात विख्यात असणाऱ्या कोलंबिया युनिव्हर्सिटीने डॉक्टर आंबेडकरांना जगातील सर्वात विद्वान व्यक्ती म्हणून सन्मानित केलं.

म्हणून मी आज आंबेडकरांना एक विचारधारा म्हटलं , कारण विचार बदलत राहतात स्वतःचा प्रवाह बदलतात पण विचारधारा एका सरळ रेषेत जाणारी समतेची वाट दाखवणारी निर्मळ हृदयाची शुद्ध गंगा असते जी एकाच दिशेत वाहत जाते कितीही खाच खडके आले तरी स्वतःचा मार्ग शोधत राहते.

**अंजली दिनकर औतकार.**

मला खरंच आश्चर्य वाटतं जेव्हा आजची युवा पिढी सिनेसृष्टीतल्या अभिनेत्यांमध्ये राजकारणी मंडळी मध्ये स्वतःच्या आदर्श शोधू पाहते खरंच काय गरज अशा लोकांना खऱ्या आयुष्यात तसेच सो कॉल्ड सोशल मीडियावर फॉलो आणि खरोखरच फॉलो करण्याची.

तेव्हा आपल्याकडे आदर्श म्हणून घेण्यासाठी अशा महान दिग्गज मंडळींची रांगच उभी आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांबद्दल फार वेळा बोलला जात पण खूप वेळा दुःखही होतं जेव्हा त्यांना जातीय भिंतींमध्ये अडकवून नुसती चेष्टा केली जाते .

त्यांच्या महानतेबद्दल त्यांच्या तल्लख बुद्धीबद्दल आणि त्यांच्या कर्तुत्वाबद्दल आपण बऱ्याच वेळा ऐकून आहोत जाणून आहोत म्हणून आज वेगळ्या विषयाला हात घालण्याचा प्रयत्न करत आहे.

आंबेडकरांना जातींमध्ये अडकवून ठेवण्यासाठी सगळ्यात मोठं कारण जे समोर करण्यात येतं ते म्हणजे त्यांनी दलित किंवा अनुसूचित जातींना दिलेला आरक्षण . नक्कीच या गोष्टीला मी सुद्धा सहमत आहे की आज भारत ज्या स्थितीत उभा आहे तिथे आरक्षणाची काडी मात्र ही गरज नाही !

आणि नसावी कारण सर्वांना समान जगण्याचा हक्क दिलेला असताना आरक्षण नावाची कुरबुर का नेमकी मध्ये येते? तर मंडळी डॉक्टर आंबेडकर नेहमी म्हणायचे जो माणूस शिकत नाही त्याला झुकत राहावं लागतं. आरक्षणाच्या एवढ्या मोठ्या मुद्द्यावर माझ्यासारख्या शाळकरी मुलीने बोललेलं अगदी मुंग्यांच्या हालचालींसारखा आहे ज्याने फारसा फरक पडत नाही पण बोलणं गरजेचं. खरंच आरक्षणाची गरज नाही तर आज स्त्रिया का वर्किंग प्लेस मध्ये स्वतःचे हक्क मागत आहेत ?

का वडिलांच्या संपत्तीत त्यांचा 50 टक्के वाटा मागत आहेत ?

जातीय आरक्षणाची आज गरज नसली तरी तो काळ फार वेगळा होता जिथे एका विशिष्ट जातीत जन्माला आला म्हणून फक्त कामांची बंधन घातली जात नसत तर बुद्धीलाही अंकुश लावले जात . मग खालच्या जातीत जन्मला आलेले आंबेडकर एक मोठे अधिकारी असले तरीसुद्धा उच्च जातीतून आलेला पण ऑफिसमध्ये पिऊन असणारा माणूस,, सुद्धा त्यांच्या अंगावर दुरून फाईल फेकून जायचा.

आता मग काही आंबेडकरांनी स्वतःवर झालेले अन्याय त्यांची खुन्नस काढण्यासाठी आरक्षण संविधानात अंतर्भूत केलं असं नव्हतं. जेव्हा भारत स्वतंत्र झाला तेव्हा इथल्या राजकारणी मंडळींनी जे पुढे देश चालवणार होते त्या सगळ्या दिग्गज लोकांनी उद्याच्या भारताचे भविष्य काय असणार कदाचित भारताकडे स्वतःचा एक तंत्र असतं जगण्याची शैली असती तर, भारत कधीच पारतंत्र्यात गेला नसता , पण इथल्या लोकांमध्ये जातीपाती, कर्मकांड आणि राजकीय सत्ता अशा बऱ्याच कारणांवरून इतके खाचखडके पडले होते की सहज येऊन कोणीही अधिपत्य गाजवू शकत होतं कारण शिक्षणासाठी सुद्धा तिथे उच्च कुलात जन्माला यावं लागायचं. असो विषय लांबणीला जाईल अशात जेव्हा उद्याचं भारत जाणार कुठे हे लिहिण्याची जबाबदारी एखाद्याच्या खांद्यावर टाकायची. तेव्हा संपूर्ण भारतात एकच कायदे तज्ञ एकच तल्लख बुद्धीचा माणूस सगळ्यांच्या नजरेत उभा राहिला तो म्हणजे डॉक्टर भीमराव आंबेडकर. आणि संविधान फक्त त्यांनी लिहिलं असं मुळीच नाही संविधान लिहिण्यासाठी एक भली मोठी सभा आयोजित केली होती भल्या मोठ्या कालावधीत अहोरात्र मेहनत करून संपूर्ण भारताचा अभ्यास करून आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्रत्येक भागातून प्रत्येक राज्यातून आलेल्या अनेक बुद्धिमान लोकांची ही सभा होती.

तिथे अनेक प्रश्नांवर चर्चा होत असे... त्यांचं निरसन होत असेल आणि सगळ्या कसोट्या पार केल्यानंतर कायदा तो कायदा बनत असेल हो या सगळ्यांमध्ये बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य सर्वाधिक महत्त्वाचा आहे कारण ते खऱ्या अर्थाने भारतीय संविधानाचे शिल्पकार आहेत पण याचा अर्थ हा मुळीच नाही की त्यांच्या मनात जे कायदे आले ते त्यांनी छापून ठेवले आणि आज भारत मुर्खासारखा तेच मानतो आहे मुळीच नाही कारण एकदा इंग्रजांच्या अधिपत्या खालून मुक्त झालेला भारत पुन्हा कुणाच्याच अधिपत्याखाली येणारा नव्हता. आता हे सगळं सांगण्यामागचं कारण एवढंच की गल्लीवरची राजकारणी मंडळी असो की थोडी अडाणी मंडळी त्यांनी बाबासाहेब म्हटलं म्हणजे कुठल्यातरी विशिष्ट.

## तुम्ही भिमराया...

मौलिक विचारांची खाण,
तुम्ही भिमराया...
दिन- दुबळ्यांचा अभिमान,
तुम्ही भीमराया...
जागविला स्वाभिमान ,
तुम्ही भिमराया...
अर्धमेल्या जनतेचे प्राण,
तुम्ही भिमराया...
चवदार तळ्याची तहान,
तुम्ही भिमराया...
साऱ्या जगात महान
तुम्ही भिमराया...
दिले आम्हा संविधान,
तुम्ही भीमराया...
अवघ्या भारताची शान
तुम्ही भीमराया...
भारतरत्न सन्मान
तुम्हां भीमराया...
कोटी -कोटी प्रणाम
तुम्हां भिमराया...
तुम्हां भिमराया..

**सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे-चोपडे,**
**परभणी .९८२३०६६६०६**












# बाबासाहेब आंबेडकर आणि कामगार चळवळ



प्रा. डॉ. प्रवीण बनसोड
संपर्क क्र. 9423425129

आधुनिक केसरी

**भारतीय परिप्रेक्ष्यामध्ये जातीव्यवस्थेच्या जोडीला आर्थिक विषमतेचा प्रश्न प्रामुख्याने भेडसावत असतो. आधीच जातीभेद आणि अस्पृश्यतेच्या चक्रव्युहात दारिद्र्य, बेरोजगारी, अनारोग्य, अज्ञान यांसारख्या समस्या निर्माण झाल्याने त्याचा सरळ परिणाम मानवी विकास आणि कष्टकऱ्यांच्या जीवन पध्दतीवर होत असतो. अश्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधान लिहून कामगार, कष्टकऱ्यांच्या स्वातंत्र्य आणि सन्मानाचा जाहीरनामाच सर्वांसमोर मांडला.**



कामगार चळवळ : जागतिक संदर्भ :- इ.स. 1827 साली फिलाडेल्फियामध्ये कामाचे तास दहावर आणण्यासाठी बांधकाम उद्योगातील कामगारांचा संप घडविण्याचे श्रेय जगातील पहिली ट्रेड युनियन मानल्या गेलेल्या 'मेकॅनिक्स यूनियन ऑफ फिलाडेल्फिया' ला जाते. 1834 साली न्यूयॉर्क मध्ये बेकरी कामगारांच्या संपादरम्यान 'वर्किंग मेन्स ॲडव्होकेट' नावाच्या वृत्तपत्राने छापले होते की, 'पावरोटी उद्योगात काम करणारे कारागीर अनेक वर्षांपासून इजिप्तच्या गुलामांपेक्षा जास्त यातना सहन करत आहेत. त्यांना दर चोवीस तासापैकी सरासरी अठरा ते वीस तास काम करावे लागते."

जगातील काही भागांमध्ये काम करण्याच्या तासावरुन आंदोलने करण्यात येत होती. अमेरिका, ऑस्ट्रेलिया यासारख्या देशामध्ये ही आंदोलने जोरात सुरु होती. ऑस्ट्रेलियात 1856 मध्ये तर अमेरिकन कॉंग्रेसने 1868 मध्ये आठ तास कामाचा कायदा पास केला. यांशिवाय स्त्रियांच्या बाबत अनेक प्रश्नांबाबत सर्वत्र चर्चा सुरु होती. या वेगवेगळ्या आंदोलनातून पुढे कामगारांचे प्रश्न जगासमोर येऊ लागले. 1 मे कामगार दिन आणि 8 मार्च जागतिक महिला दिन याच लढ्याच्या स्मरणार्थ आज जगात सर्वत्र साजरे करण्यात येतात.

इ.स. 1799 ते 1809 ह्या मुदतीत इंग्लंडमध्ये करण्यात आलेल्या कायद्यामध्ये ( कॅबीनेशन ॲक्ट ) कामगारांनी आपली संघटना उभी करणे हे बेकायदेशीर होते. या कारणामुळे सुरुवातीच्या काळात कामगार संघटना गुप्तपणे कार्यरत होत्या. इंग्लंडमध्ये पहिला राजकीय पक्ष 'इंडिपेडंट लेबर पार्टी' 1893 मध्ये जन्माला आला, तो आज 'मजूर पक्ष' म्हणून ओळखला जातो.

एकत्रित येऊन मागण्या केल्यास आपला प्रभाव मालकांवर पडू शकतो, याचा अनुभव आल्याने कामगार एकत्रित येऊ लागले. अमेरिकेतील कामगारांनी 1 मे 1886 रोजी सार्वत्रिक संपाचे हत्यार उपसल्याने जागतिक पटलावर कामगार वर्गाविषयी जागृती होऊ लागली. कार्लमार्क्स यांनी सन 1869 मध्ये लंडन येथे कामगारांची पहिली आंतरराष्ट्रीय संघटना 'International Working Men's Association' स्थापना केली. त्यामुळे जागतिक पातळीवर नवा विचारप्रवाह निर्माण झाला. 1917 साली रशियात राज्यक्रांती झाल्याने संपूर्ण जगाचे लक्ष्य वेधले गेले.

**कामगार चळवळ :** भारत :- भारतात सत्यशोधक समाजाचे नेते नारायण मेघाजी लोखंडे यांच्या प्रयत्नातून 1885 साली कामगार वर्ग संघटीत होण्यास प्रारंभ झाला, असे म्हटले जाते. जी.आय.पी. रेल्वेच्या सिग्नल खात्याच्या लोकांनी 1885 मध्ये संप केला. तर 1905 साली वंगभंग चळवळीतून आगगाडी कारखाना, कापड गिरण्या आणि सरकारी छापखाण्यातील कामगारांचे संप झाले. 1920 मध्ये 'ऑल इंडीया ट्रेड युनियन' ची स्थापना झाली. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजूर पक्षा' ची 1936 मध्ये स्थापना केली. पुढे बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेत कष्टकरी कामगारांबाबत महत्त्वाचे कायदे केले.

स्वातंत्र्योत्तर काळात कामगारांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी राष्ट्रीय कामगार चौकशी आयोग दि. 24 डिसेंबर 1966 रोजी न्यायमूर्ती पी.बी. गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आला. या आयोगाने 8 ऑगस्ट 1969 रोजी अहवाल शासनास सादर केला. मात्र या अहवालात औद्योगिक कामगारांबाबत तरतुदी प्रामुख्याने होत्या. असंघटीत, ग्रामीण कामगारांबाबत फारसा विचार करण्यात आला नाही. परंतु त्यापूर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून कामगारांसाठी तरतूदी केल्या होत्या त्यामध्ये –

- **अनुच्छेद 41 :** राज्य हे आपल्या आर्थिक क्षमता व विकास यांच्या मर्यादेत कामाचा, शिक्षणाचा हक्क आणि बेकारी, वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पिडीत अशा व्यक्तिंच्या बाबतीत लोकसहाय्याचा हक्क उपलब्ध करुन देण्यासाठी परिणामकारक तरतूद करील.
- **अनुच्छेद 42 :** राज्य हे, कामाबाबत न्याय व मानवीय परिस्थिती निर्माण करण्यासाठी व प्रसूती विषयक सहाय्यासाठी तरतूद करील.
- **अनुच्छेद 43 :** राज्य हे, यथायोग्य, विधी-विधानाद्वारे किंवा आर्थिक सुसंघटन करुन शेतकी, औद्योगिक अथवा अन्य प्रकारच्या सर्व कामगारांना काम, निर्वाह वेतन, समुचित जीवनमान आणि फुरसतीचा आणि सामाजिक वा सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपयोग याची शाश्वती देणारी अशी कामाची परिस्थिती उपलब्ध करुन देण्यासाठी आणि विशेषतः ग्रामीण क्षेत्रामध्ये कुटीर उद्योगांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील.
- **अनुच्छेद 43 –** क : राज्य हे, कोणत्याही उद्योगात गुंतलेले उपक्रम, आस्थापना किंवा संघटना यांच्या व्यवस्थापनामध्ये कामगारांना सहभागी होता यावे यासाठी यथायोग्य विधी-विधानाद्वारे किंवा अन्य मार्गाने उपाययोजना करील.

अशाप्रकारे संविधानाने आर्थिक न्याय, सामाजिक सहभाग, रोजगार आणि कामाच्या ठिकाणी योग्य परिस्थिती याची तरतूद केली आहे. 1891 साली जो फॅक्टरी ॲक्ट निर्माण झाला, त्यामध्ये अनेक चांगल्या तरतूदी केवळ नारायण मेघाजी लोखंडे यांच्या आग्रहामुळे आल्या होत्या, त्याची फलश्रुती वरील तरतूदीतून घडू शकली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कामगार धोरणे :–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अभ्यासाचा मुख्य विषय अर्थशास्त्र हा होता. 'बॉम्बे लेजिस्लेटिव्ह असेम्ब्लीचे सदस्य असतांना ( 1926 ) ग्रामीण भागातील दारिद्र्याच्या समस्येचे समग्र आकलन त्यांनी उभारलेल्या आंदोलनातून प्रतिबिंबित होते.

शेतीमधील खोती पद्धती विरुद्ध त्यांनी आवाज उठवून ग्रामीण कामगारांना न्याय दिला. 'महार वतन' या नावाखाली सुरु असलेल्या गुलामगिरीविरुद्ध त्यांनी आवाज उठविल्यानंतर ग्रामीण भागातील कष्टकऱ्यांचा फार मोठा वर्ग जागृत झाला. 'व्हॉइसरॉयज एक्सिक्युटिव्ह कॉन्सिलचे कामगार सदस्य या नात्याने 1942 ते 1946 या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगार विषयक धोरणात आमुलाग्र सुधारणा सुचविल्या. त्यामध्ये सेवायोजन कार्यालयाची स्थापना ही महत्वाची सूचना होती.

'स्टेटस् ॲन्ड मायनॉरिटीज' नावाने ब्रिटीश सरकारला इ.स. 1947 साली सादर केलेल्या टिपणामध्ये भारताच्या आर्थिक विकासाची योग्य धोरणे कोणती, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले. "अत्युच्च उत्पादन क्षमतेचा विचार करुन लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियोजन करणे तसेच खाजगी उत्पादकांना कोणतीही आडकाठी न करता आणि संपत्तीचे समान वाटप होईल अशारितीने आर्थिक नियोजन करणे हे सरकारचे दायित्व आहे", असे त्यांनी नमूद केले होते.

स्वातंत्र्यानंतर भारताचे पहिले कायदामंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवी अधिकार आणि सामाजिक-आर्थिक-राजकीय समतेसाठी अथक प्रयत्न केले. 'सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीकडे दुर्लक्ष करुन राजकीय लोकशाही टिकू शकणार नाही', असा इशारा त्यांनी दिला होता. 'डायरेक्टिव्ह प्रिन्सिपल्स ऑफ दि स्टेट पॉलिसी' हा अनुच्छेद घटनेत समाविष्ट करुन त्यांनी आर्थिक लोकशाहीचा हेतू विषद केला. परंतु त्यापूर्वीच 1942 ते 1946 या कालखंडात व्हाईसरॉय मंत्रीमंडळातील मजूर मंत्री म्हणून कामगारांच्या प्रश्नांबाबत महत्वपूर्ण भाषणे व लेख लिहिले. 13 नोव्हेंबर 1943 रोजी भारतीय श्रमिक संघटना कायद्यामध्ये दुरुस्ती करणारे विधेयकही त्यांनी विधीमंडळामध्ये मांडले. या विधेयकामध्ये कामगार संघटनांना मान्यता देण्याचे बंधन मालकांवर टाकण्यात आले होते तसेच कामगार संघटनांनी पूर्तता करायच्या अटी नमूद केल्या होत्या. 1936 मध्ये 'स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पक्षाच्या जाहीरनाम्यातच कारखाण्यातील कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या हिताला अनुसरुन कार्यरत राहण्याची ग्वाही दिली होती.

सप्टेंबर 1938 मध्ये मुंबई विभाग मंडळामध्ये मांडण्यात आलेल्या औद्योगिक विवाद विधेयकावर तुटून पडतांना आपल्या भाषणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "संप म्हणजे स्वातंत्र्याच्या हक्काचे दुसरे नाव ! प्रत्येक मनुष्याला स्वातंत्र्याचा हक्क आहे असे कबूल करता तर प्रत्येक कामगाराला संप करण्याचा अधिकार आहे हे तुम्हाला कबूल करावे लागेल." बाबासाहेबांनी या विधेयकातील सक्तीच्या तडजोडीच्या कलमाला कडाडून विरोध केला. बाबासाहेबांची व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळामध्ये 20 जुलै 1942 रोजी 'कामगार मंत्री' म्हणून नियुक्ती झाली. यावेळी विविध परिषदा, चर्चासत्रे आणि व्यासपीठांवरुन केलेल्या भाषणांमधून देशातील कामगारांचे हितरक्षण व कल्याणकारी धोरणांचा पाया घातला. 1953 साली 'मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम 1953' हा कायदा गठीत करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ध्येयधोरणे कारणीभूत ठरली.

पुढे 17 सप्टेंबर 1937 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई विधीमंडळात खोती-जमिनदारी पध्दती नष्ट करणारे भारतातील पहिले विधेयक सादर केले.

दि. 1 जुलै 1938 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक महत्वाचे पत्रक प्रसिद्ध केले. "शेठ-सावकारांचे स्वातंत्र्य म्हणजे देशाचे स्वातंत्र्य नव्हे." असे या पत्रकाचे शीर्षक आहे.

या पत्रकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे श्रमिकांच्या जीवनाविषयीचे समग्र चिंतन आणि विचारांचे दर्शन घडते. 26 नोव्हेंबर 1945 रोजी नवी दिल्ली येथे आयोजित सातव्या भारतीय श्रमिक परिषदेपुढे श्रममंत्री म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अध्यक्षपदावरुन केलेल्या भाषणातून सुद्धा कामगारांबाबतचा दृष्टिकोन स्पष्ट होतो.

"सर्वात भयावह समस्या ही बेकारीची समस्या आहे. श्रमिकांचे जीवनमान खालावू नये म्हणून या समस्येच्या समाधानाकरिता आम्हाला जे काही शक्य आहे ते आम्ही केलेच पाहिजे आणि ते सुद्धा तातडीने केले पाहिजे. या परिस्थितीतून मार्ग काढण्यास तीन गोष्टी अनिवार्य आहेत, असे माझे मत आहे. पहिली म्हणजे कामाचे तास कमी करणे जेणे करुन अनेकांना रोजगार मिळेल. दुसरी म्हणजे किमान वेतनाकरिता यंत्रणा निर्माण करणे, अशा यंत्रणेच्या अभावाला बेरोजगारीची साथ मिळाली तर त्यामुळे श्रमिकांच्या जीवनस्तरात घसरण ही अपरिहार्य आहे आणि तिला प्रतिबंध हा केला गेलाच पाहिजे. तिसरी म्हणजे, कारखानदार आणि कामगार यांना सामूहिक वाटाघाटी व अन्य सर्वसाधारण समस्यांमधून मार्ग काढण्यास एकत्रित काम करणे हे शिकण्याचा प्रस्ताव असला पाहिजे."

वरील भाषणातून बाबासाहेबांचा कामगार वर्गाकडे पाहण्याचा विशाल दृष्टिकोन स्पष्ट होतो

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगाला लोकशाहीची नवीन व्याख्या दिली. मूलभूत हक्क, सामाजिक लोकशाही व आर्थिक लोकशाही यांशिवाय कामगार-श्रमिकांना त्यांचे हक्क प्राप्त होणार नाही, याचे नवे भान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीयांना दिले.

महाराष्ट्र Business Katta







